# द्वितीय वर्ष (जनरल पेपर्स)

## बँकिंग (EG - 2)

**प्रश्न १) पुढील प्रश्नांची आठ–दहा ओळीत उत्तरे लिहा.**

**अ) सावकाराची व्याख्या सांगा.**

जी व्यक्ती किंवा संस्था कर्ज देते; परंतू सहसा ठेवी स्वीकारीत नाही किंवा हुंड्यांचे व्यवहार करीत नाही अशा कोणत्याही व्यक्तीला किंवा खाजगी संस्थेला अनुलक्षून सावकार असे म्हणतात. ही व्याख्या व तिचे थोडक्यात स्पष्टीकरण आवश्यक.

**ब) भांडवल बाजार म्हणजे काय?**

ज्या बाजारात दीर्घ मुदतीच्या कर्जाचे व्यवहार होतात, त्या बाजारास भांडवल बाजार असे म्हणतात. ही व्याख्या व तिचे थोडक्यात स्पष्टीकरण आवश्यक.

**क) रोख निधी प्रमाण म्हणजे काय?**

व्यापारी बँकांना त्यांच्याकडे जमा होणाऱ्या एकूण ठेवींपैकी काही भाग मध्यवर्ती बँकेकडे रोख स्वरूपात ठेवावा लागतो. त्याचे एकूण ठेवींशी असलेले जे प्रमाण असते त्याला रोख निधी प्रमाण असे म्हणतात. याबाबतचे थोडक्यात स्पष्टीकरण.

**ड) बँकेतर वित्तीय संस्था म्हणजे काय?**

अर्थशास्त्राच्या दृष्टीकोनातून बँकेतर वित्तीय संस्था ही व्यापक संकल्पना असून त्यामध्ये अशा संस्थांचा समावेश होतो की ज्यांच्या देयता कर्ज फेडण्याचे साधन म्हणून वापरल्या जात नाहीत. याबाबतचे थोडक्यात स्पष्टीकरण.

**प्रश्न २) पुढील प्रश्नांची २५–३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**अ) घटक बँकांची वैशिष्ट्ये सांगा.**

घटक बँकेची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण, वैशिष्ट्ये स्पष्ट करताना पुढील मुद्दे प्रत्येकी दोन–तीन ओळीत लिहावेत. इतरत्र शाखा नसतात, एक शाखा एक कार्यालय, मर्यादीत शाखा विस्तार, मर्यादीत व्यवसाय, भांडवल–ठेवी–गुंतवणूक प्रमाण कमी, स्थानिक पातळीवरचे व्यवस्थापन, इतर बँकेचे नियंत्रण नसते, इतर बँकांवर नियंत्रण नसते, इ.

**ब) व्यापारी बँकेच्या ताळेबंदाचे महत्त्व स्पष्ट करा.**

ताळेबंदाची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण. महत्त्व स्पष्ट करताना पुढील मुद्दे प्रत्येकी चार – पाच ओळीत लिहावेत. बँक व्यवसायाच्या प्रगतीची कल्पना, बँकनियंत्रणासाठी आवश्यक, देशातील बँकिंग क्षेत्राच्या प्रगतीचा अंदाज, भागधारक – ठेवीधारकांच्या दृष्टीने उपयुक्त, आर्थिक स्थैर्य – रोखता – लाभ प्रदता – गुंतवणूक याविषयीचा अंदाज येतो.

**क) नाणे बाजाराची कार्ये सांगा.**

नाणे बाजाराची व्याख्या लिहून थोडक्यात स्पष्टीकरण, कार्ये स्पष्ट करताना पुढील मुद्दे प्रत्येकी तीन–चार ओळीत स्पष्ट करावेत. व्यापार–उद्योग–क्षेत्रांना मदत, मध्यवर्ती बँकेला मदत, अल्पकालीन गुंतवणूकीची सोय, सरकारला मदत, व्याजदरातील भिन्नता कमी करण्यास मदत, भांडवल बाजाराच्या दृष्टीने महत्त्व, व्यापारी व सहकारी बँकांना उपयुक्त, आर्थिक विकासाला मदत. इ.

**ड) यशस्वी पतनियंत्रणासाठीच्या आवश्यक अटी कोणत्या?**

पतनियंत्रणाची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण, पतनियंत्रणाचे विविध मार्ग वापरले जातात त्यावेळी पुढील आवश्यक अटी असाव्या लागतात. मध्यवर्ती बँकेला व्यापक अधिकार, विकसित व सुसंघटित नाणे बाजाराचे अस्तित्व, मध्यवर्ती बँक व इतर वित्तीय संस्था यांच्यात सहकार्य, प्रभावी मध्यवर्ती बँक, मध्यवर्ती बँकेच्या कारभारात हस्तक्षेप नको, इ.

**प्रश्न ३) टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) बँक व्यवसायाची उत्क्रांती.**

इ. स. पूर्व २००० वर्षापासूनचा इतिहास लिहीणे आवश्यक. बँक व्यवसायात उत्तरोत्तर कसा बदल होत गेला याविषयी पुस्तकाच्या आधारे उत्तर लिहावे.

**ब) शाखा बँक पद्धतीचे फायदे.**

ज्या बँक पद्धतीत बँकेचे एक मध्यवर्ती कार्यालय असते व अशा बँकेच्या अनेक शाखा निरनिराळ्या ठिकाणी स्थापन करून बँक व्यवसाय केला जातो. या पद्धतीला शाखा बँक पद्धती म्हणतात. फायदे – मोठ्या व्यवसायाचे लाभ, कुशल कर्मचारी, व्यवस्थापकीय कार्यक्षमता, प्रशिक्षीत कर्मचारी, श्रमविभागणी, खर्चावर नियंत्रण, भांडवलाची योग्य गुंतवणूक, समान – स्थिर व्याजदर, जास्त सेवा–सुविधा, परस्पर सहकार्य, कमी राखीव निधी, मध्यवर्ती बँकेचे नियंत्रण, बँक बुडण्याचा धोका कमी इ. मुद्दे फायदे म्हणून थोडक्यात स्पष्ट करावेत.

**क) संयुक्त हिंदू कुटुंबाचे खाते.**

जेव्हा एकत्र कुटुंबातील सर्व सभासद त्या कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या नियंत्रणाखाली व्यवसाय करतात तेव्हा त्या व्यवसायाला संयुक्त कुटुंब व्यवसाय म्हणतात. अशा व्यवसायासाठी बँकेत खाते सुरू करणे, ते चालविणे याबाबतची सविस्तर माहिती पुस्तकाच्या आधारे स्पष्ट करावी.

**ड) चक्रवाढ व्याज.**

जेव्हा कर्जदार कर्जफेड करीत नाहीत तेव्हा मुद्दलाबरोबर व्याजही थकत जाते. अशावेळी बँक, कर्जाच्या रकमेसह थकलेल्या व्याजाच्या रकमेवरही व्याजाची आकारणी करतात. अशा पद्धतीने केलेल्या व्याजाच्या आकारणीला चक्रवाढ व्याज आकारणी म्हणतात. याबाबतचे स्पष्टीकरण उदाहरणासह द्यावे.

**प्रश्न ४) रिझर्व्ह बँकेला विकसनशील देशामध्ये कोणत्या स्वरुपाची भूमिका पार पाडावी लागते?**

रिझर्व्ह बँकेलाच मध्यवर्ती बँक असेही म्हणतात. व्याख्या लिहून थोडक्यात स्पष्टीकरण करावे. विकसनशील देशातील भूमिका स्पष्ट करताना पुढील मुद्दे प्रत्येकी तीन–चार ओळीत स्पष्ट करावेत. बँकिंग व्यवसाय संघटीत विकसित करणे, नाणे बाजार नियंत्रण, भांडवल निर्मितीस प्रोत्साहन, औद्योगिकीकरणास चालना, हुंडी बाजाराचा विकास, गुंतवणूकीसाठी वातावरण - प्रोत्साहन, प्रादेशिक समतोल विकास, अर्थव्यवस्थेतील विविध घटकांमध्ये समन्वय, चलनविषयक धोरणांची अंमलबजावणी, तुटीच्या अर्थभरण्याची व्यवस्था, रोजगार वाढ, पतपुरवठ्याची व्यवस्था, स्थिर विनीमय दर, किंमत पातळी स्थिरता, पतचलनाचे परिणामकारक नियंत्रण, पतपुरवठा अग्रक्रम ठरविणे, शाखा विस्ताराचे राष्ट्रीय धोरण, परकिय चलन साठ्याचा उपयोग, केंद्र सरकारला मार्गदर्शन, देशाचा सर्वांगीण आर्थिक विकास. इ.

**प्रश्न ५) विकास बँकांची वित्तीय व प्रवर्तनात्मक कार्ये स्पष्ट करा.**

विकास बँकेची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण. विकास बँकांना आपली कार्ये दोन प्रकारच्या भूमिकेतून करावी लागतात.

अ) वित्तीय कार्ये – कर्जे देणे, कर्जाची हमी देणे, भागविक्रिचा विमा काढणे, भाग खरेदी करणे, कर्जरोखे – विकास रोखे विकत घेणे, पुनर्वित्त पुरवठा करणे, हुंड्या – वचनचिठ्ठ्यांची पुनर्वटवणूक करणे.

ब) प्रवर्तनात्मक (विकासात्मक) कार्ये - उद्योगांना सल्ला, संशोधन कार्य, नवीन उद्योग स्थापनेस सल्ला, तांत्रिक – आर्थिक मदत, नवीन क्षेत्रांचा शोध, सर्वेक्षण करणे, प्रकल्प तयार करणे, विकासात्मक सेवा पुरविणे, आर्थिक गुंतवणूक सल्ला देणे, औद्योगिक वसाहती स्थापना – व्यवस्थापन, प्रकल्पांचे मूल्यमापन, कच्चामाल आयात – वाटप नियंत्रण इ.

❁❁❁

# भारतातील सामाजिक समस्या (SG – 2)

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

१) **सामाजिक समस्येच्या सोडवणुकीसाठी समाजशास्त्र कसे उपयोगी पडते ?**

उपयोजित समाजशास्त्राद्वारे सामाजिक समस्यांचा अभ्यास, संशोधन व निर्मूलन कार्यात मार्गदर्शन. समाजशास्त्रज्ञांच्या विविध संस्थांमध्ये नेमणुका.

२) **सामाजिक समस्येबाबत कोणत्याही दोन प्रतिक्रिया लिहा.**

सामाजिक समस्येबाबत एकूण सहा प्रतिक्रिया – उदासिनता, दैववादी, तुच्छतावादी, हितसंबंध रक्षण, भावनिक दृष्टिकोन, सामाजिक शास्त्रज्ञांची प्रतिक्रिया.

३) **दारिद्रय म्हणजे काय ?**

गिलीन आणि गिलीन ,विल्यम ऑगबर्न यांची व्याख्या. दारिद्र्याचे मोजमाप कसे केले जाते.

४) **परित्याग व विलगीकरण म्हणजे काय ?**

दोन्हीचा अर्थ लिहिणे आवश्यक.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) **भारतातील लोकसंख्यावाढीची कारणे लिहा.**

समशितोष्ण हवामान, लहान वयात विवाह, बहुपत्नी विवाह, मुलगा हवा हा अट्टाहास, स्त्रियांचे कमी शिक्षण, मनोरंजनाच्या स्वस्त साधनांचा अभाव.

२) **सुशिक्षित बेकारीची कारणे लिहा.**

सदोष शिक्षणपध्दती, भ्रष्टाचार, नियोजनातील अपयश, धाडसी संयोजनाचा अभाव.

३) **बालगुन्हेगारीची कारणे स्पष्ट करा.**

कुटुंब, शेजार, वाईट संगत, चित्रपट – मनोरंजन साधने, बेकारी, गलिच्छ वस्त्या, शहरीकरण.

४) **बालकामगारांच्या समस्येची कारणे लिहा.**

गरज, कर्जफेड, आर्थिक चणचण, सामाजिक विषमता, शैक्षणिक मागासलेपण व पालकांचे अज्ञान, शिक्षणाच्या संधीचा अभाव, प्रौढांपेक्षा बालकामगार सोईचे, विघटीत कुटुंब, कायद्यांची अंमलबजावणी नाही.

**प्रश्न ३. टीपा लिहा (कोणत्याही दोन)**

१) **सामाजिक विघटनास कारणीभूत घटक.**

नियमांचे पालन न होणे, सांस्कृतिक पाश्चायन व सांस्कृतिक संघर्ष, औद्योगिकीकरण, प्राथमिक समूहातील संबंधात बदल. भौतिक घटक.

२) **वेश्यांच्या पुनर्वसनात येणाऱ्या अडचणी.**

पुनर्वसनाच्या अपुऱ्या सोयी, वेश्यागृहाचे मालक-मालकीण, दलाल मोकळे राहतात. एकदा व्यवसायात आल्यावर काही करण्याची क्षमता राहत नाही, कुटुंब व गावाकडून स्वीकार होत नाही. वेश्यांना महिला वसतिगृहात ठेवण्यास चालक तयार नसतात.

३) **शिक्षेचे प्रकार.**

गुन्हेगाराला कोणत्या प्रकारची शिक्षा करावी याबाबत विविध मते. प्रकार – कारागृह, खुले कारागृह, परिविक्षा पध्दती, अभिवचन किंवा पॅरोल पध्दती.

४) **स्त्री कामगारांची समस्या :**

स्त्री कामगारांच्या संख्येत वाढ होण्याची कारणे, स्त्रियांना डावलून पुरुषांना रोजगार देण्याची प्रवृत्ती – कारणे, स्त्री कामगार विषयक कायदे

**प्रश्न ४. कुटुंबविघटन म्हणजे काय ? कुटुंबविघटनाची कारणे स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक –** कुटुंब हा सर्वप्रथम असा गट असून सर्व समाजाचा तो केंद्रबिंदू आहे. १९ व्या शतकानंतरच्या औद्योगिकीकरणाचे परिणाम दूरगामी स्वरुपाचे. कुटुंब संस्थेची संरचना व कार्य यात बदल.

**कुटूंब विघटनाची कारणे**– कुटुंबांतर्गत कारणे– भूमिका संघर्ष, भूमिकांविषयीचा असंतोष, सहकार्याचा अभाव, पिढीतील अंतर,

**बहिर्गत कारणे :** औद्योगिकीकरण, शहरीकरण, शीघ्र परिवर्तन, शिथिल नियंत्रण.

**प्रश्न ५. मादक पदार्थांच्या सेवनाची कारणे व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक** – मादक पदार्थांच्या सेवनाच्या समस्येने आज उग्र स्वरुप धारण केले आहे. तरुणांमध्ये मादक पदार्थ सेवनाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने समाज व देशाच्या दृष्टीने ती मोठी चिंतेची बाब.

**मादक पदार्थांचे सेवन कारणे** – मानसिक, सामाजिक, शारीरिक व इतर कारणे.

**प्रतिबंधात्मक उपाय** – मादक पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी या पदार्थांच्या सेवनामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांबद्दल तरुणांना समजावून सांगणे, संदेश देणे, कुटुंबात योग्य वातावरण राखणे, मुलांसमोर पालकांनी चांगले आदर्श निर्माण करावेत. शाळा – महाविद्यालयांत यासंबंधी माहिती देण्यासाठी शिक्षकाची नियुक्ती करावी व त्याने सल्लागाराचे व मार्गदर्शकाचे काम करावे, समाजाच्या सर्व स्तरांवर यासंबंधी जनजागृती होणे आवश्यक .

❁❁❁

## आधुनिक जगाचा इतिहास (इ.स. १४५० ते १९९१)(HG - 2)

टीप : १. **उत्तरामध्ये सनावळ्यांवर भर नको.**

२. **प्रस्तावना व समारोप नमुन्यादाखल दिले असून उत्तरास अनुरूप वेगळी प्रस्तावना व समारोप लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १ खालील प्रश्नांची ८ ते १० वाक्यात उत्तरे लिहा.**

**१) औद्योगिक क्रांती म्हणजे काय?**

प्रस्तावना –औद्योगिक क्रांतीची सुरुवात १८व्या शतकात इंग्लंड या देशात झाली.

औद्योगिक क्रांतीचा अर्थ – व्यापारवाढ, भांडवलाची उपलब्धता यामुळे जलद उत्पादनाची गरज, बौध्दिक व शास्त्रीय प्रगतीमुळे नवे तंत्र व नवी यंत्रे यांचा शोध यातून उत्पादनवाढ व जलद उत्पादन.

समारोप – औद्योगिक क्रांतीचे अनेक तत्कालीन व दूरगामी परिणाम संपूर्ण जगावर घडून आले.

**२ ) फ्रेंच क्रांतीतील टेनिस कोर्ट शपथ या घटनेची माहिती द्या.**

प्रस्तावना – इ.स. १७९९ मध्ये फ्रान्स या देशात एक महान राजकीय व सामाजिक क्रांती घडून आली. या क्रांतीची सुरुवात टेनिस कोर्ट शपथ या घटनेने झाली.

टेनिस कोर्ट शपथ – पार्श्वभूमी – इस्टेट जनरलमधील मतदानाबाबत मतभेद, सभागृहास टाळे शेजारील टेनिस कोर्टावर तिसऱ्या वर्गाची बैठक, राज्यघटना स्थापन होईपर्यत ऐक्य ठेवण्याबाबत शपथ.

समारोप – या घटनेचे महत्त्व : ही घटना म्हणजे नव्या मध्यम वर्गाने फ्रान्समधील सरंजामशाहीविरुध्द उगारलेले बंडाचे पहिले पाऊल होते.

**३) रशियन क्रांतीच्या पहिल्या टप्प्याचे वर्णन करा.**

प्रस्तावना – इ.स. १९१७ मध्ये रशिया या देशामध्ये घडून आलेल्या महान क्रांतीचे दोन टप्पे होते.

पहिला टप्पा – मार्च क्रांती – झारशाहीचा शेवट, झारचा राजिनामा, झारच्या घराण्याचा अंत.

समारोप – दुसऱ्या टप्प्यातील साम्यवादी क्रांतीची पूर्वतयारी पहिल्या टप्प्यातील घटनांनी केली.

**४) संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा समितीचे अधिकार व कामे लिहा.**

प्रस्तावना – दुसऱ्या महायुध्दाच्या अखेरीस जागतिक शांतता व सुव्यवस्थेसाठी संयुक्त राष्ट्रसंघटना या जागतिक संघटनेची स्थापना झाली. सुरक्षा समिती हे या संघटनेचे महत्त्वाचे अंग होते.

अधिकार व कामे - संघर्षाच्या चौकशी व निरीक्षणासाठी समिती नेमणे, संघर्ष करणाऱ्यांमध्ये समझोत्यासाठी शिफारसवजा सूचना करणे, आक्रमणाविरुध्द आर्थिक, लष्करी व अन्य कारवाई करणे, सरचिटणीसपदासाठी व्यक्तीची शिफारस करणे, विविध मंडळांच्या नेमणुका करणे.

समारोप- सुरक्षा समितीने अनेक संघर्षांची सोडवणूक यशस्वीपणे केली. परंतु, सुरक्षा समितीने तिच्या कायम सदस्यांचे हितसंबंध नेहमीच जपले.

**प्र. २ खालील प्रश्नांची २५ ते ३० वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)**

**१) प्रबोधनाची सुरुवात इटलीमध्ये का झाली?**

प्रस्तावना - मध्ययुगाच्या अखेरीस युरोपमध्ये वैचारिक जागृती झाली. प्राचीन संस्कृतींचे पुनरुज्जीवन करण्याबरोबरच नवीन मूल्यांची कास धरून कला, साहित्य व विज्ञानाच्या क्षेत्रात फार मोठी भर पडली. या सांस्कृतिक चळवळीची सुरुवात इटली या देशात झाली.

प्रबोधन इटलीत सुरू होण्याची कारणे - ग्रीक विचारवंतांचे स्थलांतर, रोमन संस्कृतीची परंपरा, इटली - पूर्व-पश्चिम मिलाफाचे केंद्र, कलांना राजाश्रय व धर्माश्रय.

समारोप - प्रबोधनाने आधुनिक युगाची पायाभरणी केली.

**२) अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दाचे परिणाम लिहा.**

प्रस्तावना - इंग्लंडविरुध्द लढा पुकारून इ.स. १७८३ मध्ये अमेरिकन वसाहती स्वतंत्र झाल्या. या नवस्वतंत्र देशाने अनेक राजकीय प्रयोग राबविले.

अमेरिकन क्रांतीचे परिणाम -

नवा देश, नव्या युगाला सुरुवात, इंग्लंडवरील प्रभाव, युरोपवरील परिणाम, वसाहतवादावरील आघात, नवे प्रयोग - पहिले प्रजासत्ताक, पहिली लिखित राज्यघटना, पहिले संघराज्य, अध्यक्षीय राज्यघटना, सत्ताविभाजन.

समारोप - स्वतंत्र अमेरिका पुढील काळात महान सत्ता म्हणून पुढे आली.

**३) पहिल्या महायुध्दाची कोणतीही चार कारणे द्या.**

प्रस्तावना - इ.स. १९१४ ते १९१८ या काळात जगाने एक संहारक युध्द अनुभवले. हे युध्द एका बाजूला इंग्लंड, फ्रान्स, रशिया, इटली, जपान व अमेरिका आणि दुस-या बाजूला जर्मनी, ऑस्ट्रिया व तुर्कस्तान या दोन गटात लढले गेले.

पहिल्या महायुध्दाची कारणे -

औद्योगिक क्रांती व आधुनिक साम्राज्यवाद, गुंतागुंतीचे आंतरराष्ट्रीय राजकारण, आक्रमक राष्ट्रवाद व आक्रमक परराष्ट्र धोरण, शस्त्रास्त्रवाढ व शस्त्रास्त्रस्पर्धा, प्रभावी आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव, तत्कालिन कारण - ऑस्ट्रियन राजपुत्राची हत्या यापैकी कोणतीही चार कारणे.

समारोप - या जागतिक युध्दाच्या परिणामस्वरूपी राष्ट्रसंघाच्या रूपाने जागतिक शांततेसाठी प्रयत्न केले गेले. परंतु, प्रत्यक्षात मात्र हे महायुध्द नंतरच्या दुसऱ्या महायुध्दास कारणीभूत ठरले.

**४) जर्मनीतील हुकूमशाहीची माहिती लिहा.**

प्रस्तावना - पार्श्वभूमी : वायमर प्रजासत्ताकाचे अपयश, ज्यूंचे वर्चस्व. जर्मनीतील हुकूमशाही नाझीवाद, माईन काम्फ, आर्थिक व राजकीय भूमिका व कार्यक्रम, नाझी पक्षाची स्थापना, यश, हुकूमशाही नियंत्रण, साम्राज्यवाद

समारोप - हिटलरच्या महत्त्वाकांक्षेने जगाला दुसऱ्या महायुध्दाच्या खाईत लोटले.

**प्र. ३ खालील टिपा २५ ते ३० वाक्यात लिहा. (कोणत्याही दोन)**

**१) प्रबोधनकालीन भौगोलिक शोध**

प्रस्तावना - मध्ययुगाच्या अखेरीस एका बाजूला सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रात नवीन प्रवाह निर्माण होत असतानाच युरोपीय समाजाला बाह्य जगताची दारे खुली झाली ती या काळात लागलेल्या भौगोलिक शोधांमुळे.

पाश्र्वभूमी व कारणे – व्यापारासाठीच्या खुष्कीच्या मार्गावर तुर्कांचे नियंत्रण, धर्मप्रसाराची प्रेरणा, होकायंत्र, लांब पल्ल्याच्या बोटी इ. नवे शोध, धाडसी खलाशी. महत्त्वाचे शोध – केप ऑफ गुड होप, भारताकडे जाणारा मार्ग, पृथ्वी प्रदक्षिणा, अमेरिकेचा शोध.

समारोप – भौगोलिक शोधांचे महत्त्व – युरोपीयांच्या अनुभवात भर, विस्तारवादी महत्त्वाकांक्षेस चालना.

२) **राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे**

प्रस्तावना – पहिल्या महायुध्दाच्या संहारामुळे आणि अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या आदर्शवादातून जागतिक शांततेसाठी राष्ट्रसंघाची स्थापना झाली. परंतु, राष्ट्रसंघ संघर्ष टाळण्यात अपयशी ठरला.

राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे – व्हर्सायच्या तहातून राष्ट्रसंघाची निर्मिती, अमेरिका राष्ट्रसंघाची सदस्य झाली नाही, लष्करी कृतीचा अभाव, राष्ट्रसंघ प्रातिनिधिक झाला नाही, नि:शस्त्रीकरणाबाबत अपयश.

समारोप – राष्ट्रसंघाच्या अपयशामुळे जगाला दुसऱ्या महायुध्दास तोंड द्यावे लागले. परंतु, त्यामुळेच अधिक सामर्थ्यवान अशा आंतरराष्ट्रीय संघटनेची गरज सिध्द झाली.

३ ) **जपानमधील राष्ट्रवाद**

प्रस्तावना – १९ व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये अमेरिकेने जपानचे बंद दरवाजे परकीयांना खुले केले. यावेळी संघर्ष होऊन जपानला त्यात पराभव पत्करावा लागला. त्यातून परकियांच्या अनेक आर्थिक मागण्याही जपानला मान्य कराव्या लागल्या. त्यातूनच जपानमध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला.

जपानमधील राष्ट्रवाद

परदेशांशी करार, मेई जी सुधारणा, प्रगती, साम्राज्यविस्तार, दोन महायुध्दांतील सहभाग, शेवट.

समारोप – जपानमधील राष्ट्रवादाने जपानला एक समर्थ राष्ट्र म्हणून पुढे आणले.

४) **आफ्रिकन ऐक्याचे प्रयत्न**

प्रस्तावना – दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात आफ्रिका खंडातील राष्ट्रांना एकामागून एक स्वातंत्र्य मिळत गेले.मात्र ही राष्ट्रे कमकुवत होती. त्यामुळेच विकासासाठी त्यांनी परस्पर सहकार्य व ऐक्याचा मार्ग पत्करला.

ऐक्याचे प्रयत्न – राष्ट्रीय संघटनांची स्थापना, पॅन आफ्रिकन परिषदा, स्वातंत्र्य व आर्थिक प्रगतीसाठी सहकार्य, आफ्रिकन ऐक्य, संघटनेची स्थापना, हेतू व कार्य.

समारोप –आफ्रिकेतील राष्ट्राच्या ऐक्यामुळेच ही राष्ट्रे शीतयुध्दाला बळी पडली नाहीत.

**प्र. ४ इटलीच्या एकीकरणातील विविध टप्प्यांचे वर्णन करा.**

प्रस्तावना – इ.स. १८७० मध्ये इटालियन जगतातील विविध राज्ये एकत्रित येऊन इटली हे एकसंध राष्ट्र उदयाला आले.

इटलीच्या एकीकरणाचे टप्पे –

पिटमाँट–सार्डिनियातील सुधारणा, क्रिमियन युध्द, प्लाँविअर्सचा तह, ऑस्ट्रियाशी युध्द, मध्य इटलीतील संस्थानांचे सामिलीकरण, दक्षिण इटलीतील संस्थानांचे सामिलीकरण, व्हेनिशियाचा ताबा, रोमचा ताबा.

समारोप – एकसंध इटली हे युरोपातील समर्थ राष्ट्र बनले. या राष्ट्राच्या निर्मितीमुळे युरोपचा सत्तासमतोल बिघडून गेला. तसेच इटलीतील राष्ट्रवादाने भारतातील राष्ट्रवादी चळवळीलाही चालना दिली.

**प्र. ५ शीतयुध्द म्हणजे काय? शीतयुध्दाच्या विविध अवस्थांचा आढावा घ्या.**

प्रस्तावना – दुसऱ्या महायुध्दामध्ये अक्षगटाविरुध्द दोस्त राष्ट्रे म्हणून एकाच गटातून लढणाऱ्या अमेरिका व रशिया या दोन राष्ट्रांदरम्यान युध्द काळाच्या अखेरच्या टप्प्यातच स्पर्धा व संघर्ष निर्माण झाला आणि त्यातूनच एका नव्या प्रकारच्या युध्दाचा – शीतयुध्दाचा उदय झाला.

शीतयुध्द म्हणजे काय – दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळातील भांडवलशाही अमेरिका व साम्यवादी रशिया यांच्यातील तणावपूर्ण संबंध

शीतयुध्दाच्या अवस्था - (खालील अवस्थांचे उदाहरणांसह वर्णन करा.)
प्रतिबंधात्मक उपाययोजना, अप्रत्यक्ष अथवा माध्यमामार्फतचा संघर्ष, सहकार्य -(सहकार्याच्या कारणांसह)
समारोप - इ.स. १९९१ मध्ये अंतर्गत घडामोडींमुळे रशियन संघराज्याचे विघटन झाले. तसेच रशियाने साम्यवादाचाही त्याग केला. त्यामुळे शीतयुध्दाच्या मूळ कारणाचाच -स्पर्धा व वैचारिक मतभेद - शेवट होऊन पर्यायाने शीतयुध्दाचाही शेवट झाला.

❁❁❁

## भारतातील स्थानिक स्वराज्य शासनसंस्था (PG - 2)

**प्रश्न १ खालील चारही प्रश्नांची ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

**अ) बलवतंराय मेहता समितीच्या निर्मिती मागील उद्देश स्पष्ट करा.**

उत्तराचे मुद्दे – सामूहिक विकास कार्यक्रम व विविध कार्यक्षेत्राचा अभ्यास करणे, विविध कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या तरतुदींचा अभ्यास करणे, विकासाचा वेग वाढवून कार्ये पार पाडण्यासाठी कामांच्या पद्धती व संघटन यांचा अभ्यास करणे, विविध विकास योजनांचे यश व फलिताबाबत अहवाल देण्यासाठी पद्धतींचा विचार करणे.

वरीलप्रमाणे बलवंतराय मेहता समितीच्या निर्मिती मागील उद्देश लिहावेत.

**ब) ७३ व्या घटनादुरूस्तीतील प्रमुख तरतुदी सांगा.**

उत्तरे मुद्दे – १) पंचायत राज संस्थांची निर्मिती २) कार्यकाल ३) निवडणुका ४) आरक्षण ५) आर्थिक निधी ६) हिशेब तपासणी ७) ग्रामसभेचे अधिकार ८) पंचायत राज्य संस्थांचे अधिकार व जबाबदाऱ्या इत्यादी संदर्भातील प्रमुख तरतुदी ७३ व्या घटनादुरुस्तीबाबत सांगता येतील. या तरतुदी थोडक्यात लिहाव्यात.

**क) ग्रामपंचायतीचे अधिकार व कार्ये लिहा.**

उत्तराचे मुद्दे – ग्रामपातळीवरील ग्रामपंचायत ही अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. ग्रामपंचायतीकडे ७८ विषय सोपविलेले आहेत. ७३ व्या घटनादुरुस्तीने त्या कामांमध्ये आणखी भर पडली आहे. ग्रामपंचायतीचे अधिकार व प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे - १) आरोग्य २) सामान्य प्रशासकीय कामे ३) शिक्षण ४) संरक्षण ५) शेती ६) समाजकल्याण ७) सहकार ८) विकास कामे इत्यादी ग्रामपंचायतीचे अधिकार व कार्ये थोडक्यात स्पष्ट करून लिहावेत.

**ड) 'गटविकास अधिकारी' यावर टिपण तयार करा.**

उत्तराचे मुद्दे – तालुका पातळीवर पंचायत समितीसाठी प्रशासकीय प्रमुख म्हणून गटविकास अधिकारी (बी. डी. ओ.) असतो.

१) गटविकास अधिकाऱ्याची नेमणूक.

२) गटविकास अधिकाऱ्याचे अधिकार व कार्ये.

इत्यादी मुद्दे लिहावेत.

**प्रश्न २ खालील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**अ. लॉर्ड रिपन यांना भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे जनक का म्हटले जाते?**

**प्रस्तावना** – ब्रिटिशांनी भारतात इंग्लंडच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण केल्या. परंतु १८८० पर्यंत त्या पूर्णपणे इंग्रजांच्या हाती होत्या. मात्र लॉर्ड रिपन यांनी प्रथमच भारतीयांना स्थानिक स्वराज्य संस्थातून सत्ता देण्यासाठी पाऊल उचलले.

लॉर्ड रिपन भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे जनक -

१) लॉर्ड रिपन यांचा १८८२ मधील ठराव थोडक्यात लिहावा.

२) लॉर्ड रिपनच्या ठरावाचे महत्त्व लिहावे.

**समारोप** – लॉर्ड रिपनच्या ठरावामुळे भारतीयांना स्थानिक स्वराज्य संस्थातून सत्ता मिळणे शक्य झाले.

**ब. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाची साधने सांगा.**

**प्रस्तावना** – जिल्हा परिषदेची रचना, अधिकार व कार्ये अगदी थोडक्यात लिहावे.

जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाची साधने – १) कर २) अनुदान ३) कर्ज ४) जिल्हा परिषदेच्या मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न व फी इत्यादी.

**समारोप** – जिल्हा परिषदेला मुख्यतः सरकारी अनुदानावर अवलंबून रहावे लागते. त्याफुळे त्यांची स्वायत्तता कमी होऊन त्या सरकारी संस्था बनल्याप्रमाणे स्थिती दिसून येते.

**क. पुढील मुद्यांच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थेबाबत माहिती लिहा.**

**अ) औद्योगिक नगरी ब) छावणी मंडळ**

**प्रस्तावना** – स्थानिक स्वराज्य संस्था ह्या ग्रामीण भागाप्रमाणे नागरी (शहरी) भागातही महत्त्वपूर्ण कार्य पार पाडीत आहेत. त्यासाठी औद्योगिक नगरी व छावणी मंडळ या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे.

अ) औद्योगिक नगरी – औद्योगिक नगरीची रचना, कार्ये लिहावेत.

ब) छावणी मंडळ – वैशिष्ट्ये, रचना, कार्ये लिहावेत.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**ड. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे मूल्यमापन करा.**

**प्रस्तावना** - स्थानिक स्वराज्य संस्थांमुळे सामान्य जनतेला सत्तेमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेता येऊन लोकशाही संवर्धनास उपयुक्त अशी कर्तव्याची जाणीव निर्माण होते. मात्र ज्या उद्देशाने स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण केल्या त्यात वेळोवेळी बदल घडवून आणले. त्यात काही बाबतीत यश मिळाले असले तरी काही बाबतीत उणिवा, त्रुटी जाणवतात.

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे मूल्यमापन –

१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या त्रुटी लिहाव्यात.

२) स्थानिक स्वराज्य संस्थांचे यश लिहावे.

**समारोप** – स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुधारणेसाठीचे उपाय अगदी थोडक्यात सारांश रुपाने लिहावे.

**प्रश्न ३. टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) वसंतराव नाईक समिती**

**प्रस्तावना** – महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रातील परिस्थितीचा अभ्यास करून मेहता समितीच्या शिफारशींमध्ये येथील विशिष्ट व परिस्थितीनुरूप बदल करण्यासाठी वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली १ जून १९६० मध्ये एक समितीची नेमणूक केली. वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्रात पंचायत राज्य व्यवस्था निर्माण करण्यात आली.

वसंतराव नाईक समिती –

१) नाईक समितीनुसार महाराष्ट्रातील पंचायती राज्याची वैशिष्ट्ये लिहावीत.

२) महाराष्ट्रातील पंचायत राज्याचा आकृतिबंध पुढीलप्रमाणे लिहावा.

अ) जिल्हा परिषद ब) पंचायत समिती क) ग्रामपंचायत

**समारोप** – महाराष्ट्रातील पंचायत राज्य व्यवस्थेला इतर काही घटकराज्यांच्या तुलनेत अधिक यश प्राप्त झालेले दिसून येते.

**ब) जिल्हा परिषद**

**प्रस्तावना**, जिल्हा परिषदेची स्थापना व रचना याबाबत थोडक्यात लिहावे.

जिल्हा परिषद – जिल्हा परिषदेचे अधिकार व कार्ये, समित्या याबाबत थोडक्यात लिहावे.

समारोप – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**क) महापौर परिषद**

**प्रस्तावना**, महापौर परिषदेची प्रथा अमेरिकेत दिसून येते. १९८० मध्ये पश्चिम बंगालने कलकत्ता महानगर पालिकेत महापौर परिषद सुरू केली.

महापौर परिषद – अ) महानगरपालिका आ) महापौर परिषद इ) समित्या ई) नगर आयुक्त इत्यादी महानगरपालिकेचे घटक लिहावे.

**समारोप** – महापौर परिषद कलकत्त्यात अत्यंत यशस्वी झाली. परंतु मुंबई व नागपुर येथे अपयश आले. परिणामी महाराष्ट्रात महापौर परिषद रद्द  करणे भाग पडले.

**ड) स्थानिक स्वराज्य संस्थांवरील नियंत्रण**

**प्रस्तावना**, स्थानिक स्वराज्य संस्था या कार्यक्षम रहाव्यात, त्यांच्यातील दोष कमी व्हावेत यासाठी त्यांचेवर नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरते.

स्थानिक स्वराज्य संस्थांवरील नियंत्रण –

१) विधिमंडळाचे नियंत्रण

२) प्रशासकीय नियंत्रण

३) आर्थिक नियंत्रण

इत्यादी नियंत्रणे अगदी थोडक्यात लिहावित.

**समारोप** – भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांवरील नियंत्रण व्यवस्थेत काही उणीवा जरूर आहेत. परंतु त्या दूर करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रगतीला वेग देणे जरूरीचे आहे.

**प्रश्न ४ स्थानिक स्वराज्य संस्थांची व्याख्या, वैशिष्ट्ये सांगून महत्त्व स्पष्ट करा.**

**प्रस्तावना**, स्थानिक स्वराज्य संस्था भारतात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. आज भारताच्या विकासासाठी व राष्ट्रबांधणीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत पायावर कार्य करीत असणे आवश्यक आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांची व्याख्या – गिलख्रिस्ट, कार्ल जे फ्रेडरिक, एल्. गोल्डिंग यांच्या व्याख्यांपैकी कोणत्याही दोन व्याख्या लिहिणे.

वैशिष्ट्ये – कायद्याने निर्मिती, स्थानिक विषयांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार, काही प्रमाणात निर्णय स्वातंत्र्य इत्यादी वैशिष्ट्ये.

महत्त्व – कामाचा भार कमी होतो, कार्यक्षम प्रशासनासाठी, स्थानिक जनतेचे सहकार्य, जनसेवा, राजकीय शिक्षण मिळते, लोकशाहीसाठी उपयुक्त, सरकार व जनता यामधील दुवा इत्यादी महत्त्व.

**समारोप** – स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व लक्षात घेऊन जनतेने जागरुक राहून त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे.

**प्रश्न ५. ‘महानगरपालिका’ यावर सविस्तर टिपण तयार करा.**

**प्रस्तावना**, शहरांच्या स्वरुपांत विविधता व विसंगती आढळून येते. त्यामुळे शहरांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी व प्रगतीसाठी महानगरपालिका महत्त्वाची कामे करते.

महानगरपालिका –

१) स्वरूप २) वैशिष्ट्ये ३) निर्मिती ४) रचना ५) पदाधिकारी ६) समित्या ७) महानगरपालिकेची कार्ये इत्यादी मुद्यांच्या आधारे महानगरपालिका यावर टिपण लिहावे. वरील १ ते ७ मुद्दे थोडक्यात लिहावेत.

**समारोप** – महानगरपालिकांचे मूल्यमापन सारांशरूपाने थोडक्यात लिहावे.

❁❁❁

## कृषी भूगोल – (GG – 2)

**प्रश्न १ ला पुढील प्रश्नांची उत्तरे ८ ते १० ओळीत लिहा.**

**१) कृषी भूगोलाच्या अभ्यासाचे मुख्य हेतू लिहा.**

शेतीचे वितरण, कृषी प्रकार, कृषी बदल, कृषी व्यवसाय या मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

**२) जलसिंचनाच्या साधनांची माहिती लिहा.**

कालवे, विहिरी, तलाव, ट्युबवेल्स व लिफ्ट या साधनाची माहिती लिहिणे आवश्यक.

३) **मळ्याच्या शेतीचा वृत्तांत लिहा.**

मळ्याच्या शेतीची व्याख्या, शेतीचे प्रदेश, पिकांचे प्रकार, हवामान इत्यादी मुद्द्यांची माहिती लिहिणे आवश्यक.

४) **मिश्र शेतीचे फायदे लिहा.**

जमिनीचा कस कायम, पशुखाद्य स्वस्त, आर्थिक फायदे, आधारित उद्योग, इत्यादी मुद्द्यांची माहिती.

**प्रश्न २ रा. पुढील प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० ओळीत लिहा. (कोणतेही दोन)**

१) **जमिनीची धूप याविषयी थोडक्यात माहिती लिहा.**

प्रस्तावना – व्याख्या

मुद्दे - जमिनीच्या धूपेची कारणे, शेतीकडे दुर्लक्ष, अतिरिक्त गुरांचा वावर, अतिरिक्त पाणी, नैसर्गिक घटक – पूर, पाऊस, वारा इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

२) **कृषीवर परिणाम करणाऱ्या आर्थिक घटकांचे वर्णन करा.**

प्रस्तावना – कोणत्याही प्रदेशातील शेती ही त्या प्रदेशात असणाऱ्या निरनिराळ्या घटकांवर अवलंबून असते.

मुद्दे - जलसिंचन, वाहतुकीची साधने, बाजारपेठ, तांत्रिक ज्ञानाचा प्रसार, भांडवल, शासकीय धोरण इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. समारोप.

३) **व्यापारी अन्न धान्य शेतीविषयी माहिती लिहा.**

प्रस्तावना – व्यापारी अन्न धान्य शेतीची व्याख्या.

मुद्दे - शेतीचे स्थान, हवामान, जमीन, शेतीचा आकार, मर्यादित मजूर वर्ग, यंत्र सामग्री, बी–बियाणे, वाहतूक या मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

४) **गहू या पिकाचे जागतिक वितरण स्पष्ट करा.**

प्रस्तावना – गहू या पिकांचे उत्पादन जगामधील अनेक देशांमध्ये घेतले जाते.

मुद्दे - उत्पादन करणारे देश – भारत, चीन, रशिया, संयुक्त संस्थाने इत्यादी देशामधील वितरण स्पष्ट करणे आवश्यक. समारोप.

**प्रश्न ३ रा. टीपा लिहा. (कोणतेही दोन)**

१) **कृषी भूगोलाची व्याप्ती**

प्रस्तावना – कृषी भूगोलाची व्याख्या.

मुद्दे - हेतू, सामाजिक व आर्थिक घटक, जमिनीच्या वापराचे नियोजन, इतर घटकांचा अभ्यास इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

२) **मळ्याच्या शेतीच्या समस्या**

प्रस्तावना – मळ्याच्या शेतीची व्याख्या

मुद्दे - जमिनीची धूप होते, लोकसंख्या विरळ, अपुरा मजूर पुरवठा, खर्चाचे प्रमाण जास्त, पिकांवर मोठ्या प्रमाणावर कीड व रोग, उत्पादनात घट, मजूर व मालक यात संघर्ष इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

३) **भारतीय शेतीच्या समस्या**

प्रस्तावना – भारतातील प्रमुख व्यवसाय म्हणून शेतीकडे पाहिले जाते आणि मानवाच्या मूलभूत गरजा ह्या शेतीवर अवलंबून असतात.

मुद्दे - आर्थिक घटक – भांडवल, बाजारपेठा, वाहतूक, नैसर्गिक घटक – हवामान, नैसर्गिक आपत्ती, सामाजिक घटक – जमीन धारणक्षमता, जमिनीच्या तुकड्यांचे स्वरूप, तांत्रिक घटक – नवनवीन तंत्राचा वापर या सर्व मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

४) **शेतीवर आधारित उद्योगधंदे**

प्रस्तावना – स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या आर्थिक नियोजनबद्ध विकास कार्यक्रमात औद्योगिकीकरणावर भर देण्यात आला. शेतीतील उत्पादनावर अनेक उद्योगधंदे निर्माण झाले.

मुद्दे - विविध पिके – ऊस, अन्नधान्ये, गळिताची धान्ये, रबर, तंबाखू, फळे, मसाल्याचे पदार्थ, पेय पिके, तंतु पिके, गवत इत्यादी. शेती पिकांवर आधारित निर्माण होणाऱ्या उद्योगधंद्याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. सफारोप.

**प्रश्न ४ था. कृषी भूगोलाच्या अभ्यासपद्धतीचे सविस्तर वर्णन करा.**

प्रस्तावना – भारतातील मुख्य व्यवसाय शेती आहे.

मुद्दे – अभ्यास पद्धती – वस्तू पद्धती, प्रादेशिक पद्धती, अशक्यतावाद पद्धती, क्रमबद्ध पद्धती, अर्वाचिन पद्धती. या सर्व पद्धतींचे सविस्तर वर्णन करणे आवश्यक.

समारोप – या अभ्यासामुळे शेतीच्या पद्धतीची माहिती मिळते व त्यातील समस्यांसंबंधी जाणीव होते.

**प्रश्न ५ वा. भारतीय कृषी समस्यांवरील उपायांची चर्चा करा.**

प्रस्तावना – स्वातंत्र्योत्तर काळात शेती विकासाच्या दृष्टीने आणि शेतीची उत्पादकता वाढावी म्हणून भारत सरकार क्रियाशील असून उत्पादन क्षमतेत सतत वाढ घडवून आणली जात आहे.

मुद्दे – जमिनीची धूप थांबवणे, बांध घालणे, पायऱ्या पायऱ्याची शेती करणे, पूर नियंत्रण, योग्य खतांचा वापर करणे, जमीन कृषी योग्य बनविणे, उत्तम बी–बीयाण्याचा पुरवठा, नैसर्गिक व रासायनिक खतांचा वापर, जलसिंचनाच्या सोयी, शेत जमिनीचे एकत्रीकरण, अवजारात बदल, पिकांवरील रोगाचे निर्मुलन, कृषी महाविद्यालयात शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप – भारतीय शेतकरी आजही शेतीकडे केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहतात. परंतु नव – नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतीचा कसा विकास होईल त्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे.

❁❁❁

## मराठी (MG – II) अभ्यासक्रम

१) शबरी – विभावरी शिरुरकर.

२) विशाखा – कुसुमाग्रज – पुढे उल्लेख केलेल्या कविता अभ्यासक्रमात आहेत.

३) व्यक्ती आणि वल्ली – पु. ल. देशपांडे – पुढे उल्लेख केलेली व्यक्तिचित्रणे अभ्यासक्रमात आहेत.

## विशाखा – कुसुमाग्रज

१) दूर मनोऱ्यात

२) हिमलाट

३) स्वप्नांची समाप्ती

५) अहिनकूल

६) किनाऱ्यावर

९) गोदाकाठचा संधिकाल

१०) स्मृती

१२) आगगाडी व जमीन

१३) क्रांतीचा जयजयकार

१५) जा जरा पूर्वेकडे

१६) तरीही केधवा

१८) कोलंबसाचे गर्वगीत

२०) बळी

२१) लिलाव

२२) पृथ्वीचे प्रेमगीत

२३) गुलाम
२४) सहानुभूती
२५) सात
२६) माळाचे मनोगत
३५) पाचोळा
४०) आश्वासन
४५) निर्माल्य
४८) सैगल
४९) कुतूहल
५६) टिळकांच्या पुतळ्याजवळ
५७) समिधाच सख्या या.

## व्यक्ती आणि वल्ली – पु. ल. देशपांडे

१) नारायण
२) सखाराम गटणे
३) नंदा प्रधान
४) भय्या नागपूरकर
५) नाथा कामत
६) परोपकारी गंपू
७) चितळे मास्तर
८) ते चौकोनी कुटुंब
९) हंड्रेड पर्सेंट पेस्तनकाका
१०) अंतू बर्वा.

❁❁❁

## मराठी (MG – 2)

**गृहपाठ – १**

**प्रश्न – शबरीमधून तत्कालीन सामाजिक व राजकीय संदर्भ कसे स्पष्ट होतात ते सांगा.**

प्रस्तावना – लेखिकेचा परिचय – कथानकाचा कालखंड – स्वातंत्र्यपूर्ण कालखंड – दुसऱ्या महायुद्धामुळे झालेले बदल – स्वातंत्र्यपूर्व आंदोलने व मोर्चे – भूमिगत क्रांतीकारक – काळाबाजार – महागाई – स्त्रियांचे शिक्षण व नोकरी – काळे व गोरे असा वर्णभेद – गांधीवादी विचारांचा पगडा – नव्या जुन्याचा संघर्ष – शिक्षण क्षेत्रातील बदल – समारोप.

**गृहपाठ – २**

**प्रश्न – शबरी कादंबरीतील प्रमुख पात्रांचा परिचय करून द्या.**

प्रस्तावना – लेखिकेचा परिचय – कादंबरीतील प्रमुख पात्रे – शबरी व अभिराम – त्यांच्याच भोवती कथानकाची उभारणी – शबरी – सामान्य स्त्री – मध्यमवर्गीय हुशार – गणित घेऊन बी. ए. – नोकरी – तारुण्यापासून – प्रौढावस्थेपर्यंतचा प्रवास – आधुनिक विचारसरणी – वाचनाने प्रगल्भ – पतीवर प्रेम – गृहिणी – पत्नी – आई या भूमिका – या सर्व भूमिका निभावताना होणारी दमछाक – असमाधान – पतीपत्नी दुरावा – घर सोडून गंगेकाठी जाण्याचा निर्णय – माघार.

अभिराम – आकर्षक व्यक्तिमत्त्व – मध्यमवर्गाबद्दल चिड – महत्त्वाकांक्षी – व्यवसायातील यशासाठी मूल्य विवेक न बाळगणारा – भावनेला दुय्यमस्थान – व्यवहार – पैसा या गोष्टींना महत्त्व देणारा – समारोप.

**गृहपाठ – ३**

**प्रश्न – कवितांचे रसग्रहण करा.**

**१. कोलंबसाचे गर्वगीत**

**२. माळाचे मनोगत**

प्रस्तावना – कवीचा परिचय – कवितेचे शीर्षक – काव्याचा भावार्थ – सौंदर्य – संकल्पना – समारोप.

**गृहपाठ – ४**

**प्रश्न – व्यक्ती आणि वल्लीमधील व्यक्तीचित्रांची वैशिष्ट्ये विशद करा.**

प्रस्तावना – लेखकाचा परिचय – व्यक्तीचित्रांचे थोडक्यात वर्णन – माणसातील नेमकेपणा – शब्दांच्या लकबी – त्याचा वापर – प्रसंगनिष्ठ विनोद – जीवनातील विसंगती टिपण्याचे कौशल्य – नेमके व्यक्तीत्व हेरण्याचे कसब – गुणांचे कौतुक – दोषांवर विनोदातून मार्मिकता – उदाहरणे द्या – व्यक्तीचित्रांचा जिवंतपणा – लकबी – वृत्ती – स्वभाव – भाषा – संवाद – यातून वास्तववादी व्यक्तीचित्र – समारोप.

**गृहपाठ – ५**

**प्रश्न – पुढीलपैकी एका व्यक्तीचित्राचे विविध पैलू स्पष्ट करा.**

**१. हंड्रेड पर्सेंट पेस्तनकाका.**

प्रस्तावना – लेखकाचा परिचय – व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वातील पैलूंचे चित्रण – पारसी बावाजींचे वर्णन – राहण्याची व बोलण्याची लकब – प्रत्येक गोष्ट पर्सेंटेज मध्ये बोलणे – सर्व विषयांवर बोलण्याची तयारी – मिश्कील स्वभाव – समारोप.

**२. परोपकारी गंपू**

प्रस्तावना – लेखकाचा परिचय – व्यक्ती आणि वल्ली मधील आणखी एक वल्ली – उपजतच परोपकारी वृत्ती – कोणतीही गोष्ट करताना दुसऱ्यावर उपकार केल्याची भावना – गंपूचे वर्णन – रोजचा दिनक्रम – वडिलांच्या एकसष्ठीचा प्रसंग – बारशापासून मर्तिकापर्यंत सगळीकडे धावून जाण्याची तयारी – जीवनात यशस्वी असल्याचा दावा – समारोप.

**३. चितळे मास्तर**

प्रस्तावना – लेखकाचा परिचय – कोकणातील शाळा व मास्तरांचे वर्णन – शिक्षणाची खरी ओढ – शिस्त – लेखन शैलीचे वैशिष्ट्य – शिकवताना वेळेचे भान नसणे – प्रत्येक विद्यार्थ्याबद्दल आपलेपणा – स्वतःच्या मुलांमध्ये व विद्यार्थी यात कुठलाही फरक/भेदभाव न करणे – समारोप.

❁❁❁

## English (ENG – II) Syllabus

* **PROSE :-**

  Textual and Non textual
  - (1) Textual
    - (a) Answer in brief
    - (b) Short Notes
  - (2) Non-textual Comprehension.

* **GRAMMAR :-**
  - (1) Accuracy of expression
    - (a) Use of Passive Voice
    - (b) Use of Indirect Narration
  - (2) Simple, Complex and Compound Sentence
  - (3) Anomalous Finites
  - (4) Finding the word with the required shade of meaning with the help of treasures.

* **TRANSLATION :-**

  English into Marathi/Hindi and Vice-Versa.

* **WRITING :-**

(1) Summary Writing.
(2) Letter Writing :- Formal - Application/Complaint.
(3) Report Writing.
(4) Paragraph Writing.
(5) Expansion of ideas.

* **TEXT :-**

'The Refugee and other stories'
edited by A.S. Balakrishnan and A. George

**Subject: English (Eng II)**
**Text – The refugee and other stories**
**Note: All Questions are Compulsory.**

**<u>Home Assignment No - 1</u>**

**Q.1 Answer in brief. (Any Two)** **(5)**

1) Describe Maanji's life in Bombay.
2) How is Jimmy's life changed after he meets Annabel?
3) Describe the attitude of the mother in the story "The Rocking Horse winner".
4) Why did the school management decide to change the rules of the poetry competition?

**Q.2 Write short notes on the following topics. (Any Two)** **(5)**

1) Sher Singh's Adventure in Jungle.
2) Paul's Death
3) Character of Paul's mother
4) Relation between the Kelvey Sisters

**Q.3 Read the following passage carefully and answers the questions that follow.** **(6)**

Some things we do because we have to. Some things we do because we like to. Things which attract and sustain our attention spontaneously are our interests. What we do during our moments of leisure reveals our interests. If our interests are developed along their natural channels leading on to allied occupations, our work will be an ever growing source of pleasure to us. Then the distinction between work and play vanishes and work becomes real play.

It is convenient for the purpose of vocational guidance to classify human interests under a few headings such as intellectual, practical, social, athletic and aesthetic interests. Those who are fascinated by intellectual activities form the first group. Professors, authors, lawyers and research workers are examples of this category. Those who are fascinated by practical things in life form the second group. They take delight in designing, making, working and repairing things. They pull them to pieces and put them together. The meccano enthusiasts, the radio fiend, the budding photographer, all belong here.

Social interests find expression in story-telling, gossiping and attending tea parties, clubs and social gatherings. Those who are charitably inclined find joy in nursing, slum work and social service. Young people manifesting social interests should be considered for employment in which managing, advising, consoling, instructing and persuading other people play an important role. Salesmen, co-operative inspectors, welfare workers, nurses, practicing doctors, teachers come under this category.

Some people like beautiful things only. They take immense delight in creating something or the other. Their aesthetic sense is remarkable. Such people find pleasure in music, painting, dancing, acting, fashion designing etc. All the artists are an asset to the nation. Hence people having aesthetic capabilities should not be placed in employment where their aesthetic sensibility would be shocked and blunted by drab and ugly things. Musicians, Painters, Dancers, Actors, Fashion Designers etc. fall in this category.

Outdoor life and strenuous physical exertion are the constant delight of some people. They love all kinds of games and sports. Their vivacious interests will find a happy outlet only in active occupations. It is indeed wastage of human material to allow our finest sportsmen to languish in office or factory. Such people, having athletic interests should be marked out from their youth for employment of an active type. The army, police, excise, customs, fire service, forestry, farming etc. are their proper fields. Sportsmen, Police officers, Firemen, Farmers etc. fall in this category.

Though such kind of classification helps us to map out suitable occupational areas, we should also understand the fact that the same person may have more than one dominant interest, or he may have significant minor interests along with a dominant one. The labeling of human beings should not be overdone.

**Questions**

1. Who are the people that have intellectual interests? **(1)**
2. Which class of interests does photographers, meccano enthusiasts represent? **(1)**
3. What are people with social interest good at.? **(1)**
4. Who are the representatives of aesthetic interests? **(1)**
5. Who are the representatives of athletic interests? **(1)**
6. Which fact should be understood by us? **(2)**

## Home Assignment No. 2

**Q.1 Answer in brief. (Any Two) (5)**

1) Explain the character of Sher Singh's father from the story "My brother, My brother"
2) Describe the lamp in Doll's House.
3) Describe Maanji's life in Rawalpindi before partition.
4) What did the examiner of the poems notice about poems of Smith, Morrison and Montgomery? What did they decide at the end?

**Q.2 Write short notes on the following topics. (Any Two) (5)**

1) Problems faced by the family from the story "The Rocking Horse Winner"
2) Change in Paul
3) Character of Jimmy Valentine
4) Character Sketch of Gafur

**Q.3 Read the following passage carefully and answer the questions that follow. (6)**

It is true that chance plays a great part in human life. We many times see that our plans fail. But we should not feel that it is because of our destiny. Destiny is an excuse for idle persons. We should remember that every man is gifted with a no. of qualities. If he makes use of these qualities there is every possibility that he will be successful. But if he keeps on blaming his fate he will never try to make use of his wonderful qualities and he may have to face a failure. Remember always that, man is the architect of his own fortune.

**Questions**

1) Who is the architect of man's fortune? How?
2) Who gives excuses of destiny? Why?
3) How can one be successful?
4) Write few gifts of God which are given to us. How should we use these gifts?
5) Who plays a great part in human life?

## Home Assignment No 3

**Q.1 Change the Voice (Any Four) (4)**

1) The novel was written by John.
2) She sung a beautiful song.
3) He is completing his work.
4) Mother cooked food.
5) The maid wipes the table.

**Q.2 Change into indirect speech. (Any Four) (4)**

1) The teacher said, "The earth is round".
2) "Sit down", she said to him.
3) Manish said," Please don't give me trouble, I am busy"
4) Ketan said to Leena, "I am your brother"
5) "Mom!" he shouted "Where are you?"

**Q.3 Do as directed. (Any four) (4)**

1) He played chess. (Change the voice)
2) She will come to my house. (Convert it into Simple Past tense)

3) She works hard for money. (Make it imperative)
4) She is too tired (Remove ‘too’)
5) I am so tired that I can not walk. (Remove ‘so’)

**Q.4 Do as directed (Any four) (4)**

1) He failed in the driving test. (Make negative)
2) What a good luck it is! (Make it assertive)
3) Meeta is intelligent than anybody else. (Change the degree)
4) It is very cold. (Make exclamatory)
5) We are unable to make good toys. (Use “Can” )

## Home Assignment No 4

**Q.1 Translate the following passage into Marathi or Hindi. (4)**

Newspapers are called the fourth estate. We cannot think of a modern house without newspapers. Newspapers make us aware of what is going on in the world. It gives us national and international news. It makes us aware of what the people in the world are doing.

**Q.2 Do as Directed. (Any Four) (4)**

1) She is singer and she is dancer too. (Use ‘as well as’)
2) --------------------- stories she has written are all of great excellence. (A few/Few/the few - Fill in the blank with proper word)
3) It is very hot. (Make it Exclamatory).
4) What a pleasant surprise it is! (Make it assertive).
5) The people praised their prince. They celebrated his deeds. (Make it compound).

**Q.3 Rewrite the sentence according to instructions. (Any Four) (4)**

1) She is not very sincere. (Add a Question tag).
2) We are unable to produce good toys. (Use ‘can’)
3) He is my Brother salil said geeta. (Punctuate)
4) I saw a woman without eye (Convert it into future continuous tense).
5) She will come to my school (Convert it into present perfect tense).

**Q.4 Do as directed. (Any Four) (4)**

1) Sharad is a best student in our class. ( Change the degree)
2) Students who take their studies seriously do well in their exams. (Make it simple).
3) The peak is too high to climb. (Use “so”)
4) He is a doctor and philosopher. (Use ‘not only but also)
5) I have ------- friends. (Many/much).

## Home Assignment No 5

**Q.1 Read the following passage carefully and write down the summary of one third in length. Suggest suitable title. (4)**

Outdoor life and strenuous physical exertion are the constant delight of some people. They love all kinds of games and sports. Their vivacious interests will find a happy outlet only in vigorous and active occupations. It is indeed wastage of human material to allow our finest sportsmen to languish in office or factory. They should be marked out from their youth for employments of an active type. The army, police excise, customs, fire service, civil engineering etc. are their proper fields.

**Q.2 Write a letter to “Times of India” complaining about the nuisance caused by street dogs in your city. (4)**

**OR**

**Write a letter to the editor of the local newspaper regarding the need to plant more trees in your city.**

**Q.3 Write a paragraph in about 10-15 lines on any one of the following. (4)**

1) Oil Conservation
2) A memorable day in my life
3) My favorite Game

**Q.4 Write a report on the following topics. (Any one). (4)**

1) Write a report on about 20 lines on the opening ceremony of the new restaurant in your area.
2) Write a report on the annual day celebration in your college.

❁❁❁

# मराठी (MG – II)

## प्रश्नपेढी

**शबरी –**

१. शबरीचे कथानक थोडक्यात लिहा.
२. शबरी कादंबरीतील वातावरण विशद करा.
३. शबरी कादंबरीचे वैशिष्ट्य विशद करा.
४. कादंबरीचा शेवट – तुमचे मत मांडा.
५. शबरी कादंबरीच्या शिर्षकाची चर्चा करा.
६. शबरी कादंबरीमधून लेखिकेची वैशिष्ट्ये विशद करा.
७. टिपा लिहा.
अ) शबरी, ब) अभिराम, क) कादंबरीचे निवेदन, ड) कादंबरीतील पात्र (गौण, प्रमुख), इ) कादंबरीतील समाज.

**विशाखा –**

१. मराठी कवितेला 'विशाखा' ने नवी दृष्टी दिली – चर्चा करा.
२. कुसुमाग्रजांकडे असलेली कल्पकता आणि प्रेरकता विशाखाद्वारे स्पष्ट करा.
३. विशाखामधील सामाजिक आशय स्पष्ट करा.
४. विशाखामधील 'प्रेमकविता' यावर चर्चा करा.
५. विशाखा काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य स्पष्ट करा.
६. कवितांचे रसग्रहण करा. (पुढे नमुद केलेल्या कविता अभ्यासक्रमात आहेत.)
    १. दूर मनोऱ्यात
    २. हिमलाट
    ३. स्वप्नांची समाप्ती
    ५. अहिनकूल
    ६. किनाऱ्यावर
    ९. गोदाकाठचा संधिकाल
    १०. स्मृती
    १२. आगगाडी व जमीन
    १३. क्रांतीचा जयजयकार
    १५. जा जरा पूर्वेकडे
    १६. तरीही केधवा
    १८. कोलंबसाचे गर्वगीत
    २०. बळी
    २१. लिलाव

२२.	पृथ्वीचे प्रेमगीत
२३.	गुलाम
२४.	सहानुभूती
२५.	सात
२६.	माळाचे मनोगत
३५.	पाचोळा
४०.	आश्वासन
४५.	निर्माल्य
४८.	सैगल
४९.	कुतूहल
५६.	टिळकांच्या पुतळ्याजवळ
५७.	समिधाच सख्या या.

**व्यक्ती आणि वल्ली**

१. व्यक्ती आणि वल्ली या शब्दचित्रांच्या शीर्षकाची चर्चा करा.
२. व्यक्ती आणि वल्लीद्वारे पु. ल. देशपांडे यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य स्पष्ट करा.
३. व्यक्ती आणि वल्लीमधील व्यक्तिचित्रांचे वैशिष्ट्य विशद करा.
४. व्यक्ती आणि वल्लीमधील व्यक्ती काल्पनिक असूनही वास्तववादी वाटतात. – चर्चा करा.
५. खालील व्यक्तिमत्त्वांचे पैलू स्पष्ट करा. (फक्त पुढीलच व्यक्तिचित्रे अभ्यासक्रमात आहेत.)
   १) नारायण
   २) सखाराम गटणे
   ३) नंदा प्रधान
   ४) भय्या नागपूरकर
   ५) नाथा कामत
   ६) परोपकारी गंपू
   ७) चितळे मास्तर
   ८) ते चौकोनी कुटुंब
   ९) हंड्रेड पर्सेंट पेस्तनकाका
   १०) अंतू बर्वा.

# द्वितीय वर्ष (स्पेशल विषय)
# (अर्थशास्त्र)
# (ECONOMICS)

## सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र (ES-1)

**प्र. १ पुढील प्रश्नांची प्रत्येकी ८ – १० ओळीत उत्तरे लिहा.**

**१) अर्थशास्त्र म्हणजे काय?**

पर्यायी उपयोगांची मर्यादित साधने व अमर्यादित गरजा यांची सांगड घालण्यासाठी माणसाची जी धडपड चालते तिचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय. रॉबिन्स यांच्या या व्याख्येचे थोडक्यात स्पष्टीकरण आवश्यक.

**२) सीमांत प्राप्ती म्हणजे काय?**

एका अधिक नगाची विक्री केल्याने विक्रेत्याला जे जादा निव्वळ उत्पन्न मिळते त्याला सीमांत प्राप्ती म्हणतात. एका जादा नगाची विक्री केल्याने एकूण प्राप्तीत जी भर पडते ती त्या नगाची सीमांत प्राप्ती होय. या व्याख्येचे उदाहरणासह स्पष्टीकरण आवश्यक.

३) **मूल्यभेद म्हणजे काय?**

एकाच नियंत्रणाखाली निर्माण झालेली एक वस्तू निरनिराळ्या ग्राहकांना वेगवेगळ्या किंमतीला विकणे म्हणजे मूल्यभेद. ही व्याख्या उदाहरणासह स्पष्ट करणे आवश्यक.

४) **वेतन म्हणजे काय?**

मजुराने केलेल्या सेवेबद्दल संयोजकाने करारानुसार त्याला दिलेली पैशाच्या स्वरूपातील रक्कम म्हणजे वेतन होय. बेनहॅम यांनी दिलेली ही व्याख्या लिहून थोडक्यात स्पष्टीकरण आवश्यक.

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची २५ – ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) **मागणीची लवचिकता ठरविणारे घटक सांगा.**

मागणीच्या लवचिकतेचे थोडक्यात स्पष्टीकरण, लवचिकता ठरविणारे घटक स्पष्ट करताना पुढील मुद्यांचे स्पष्टीकरण करावे. वस्तूचे स्वरूप, उपलब्ध पर्याय, वस्तूचा उपयोग, पूरक वस्तू, उत्पन्न पातळी, गरजपूर्तीची तिव्रता, गरजांचा उद्‌भव, खर्चाचे प्रमाण, भविष्यकालीन किंमती, सरकारी नियंत्रण, राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप इ.

२) **तटस्थता वक्राची संकल्पना स्पष्ट करा.**

तटस्थता वक्र म्हणजे समान समाधान मिळवून देणारे दोन वस्तूंचे विभीन्न संच दर्शविणारा वक्र होय. या व्याख्येचे थोडक्यात स्पष्टीकरण. उपभोक्त्याने आपले सर्व उत्पन्न दोन वस्तूंवर खर्च करावयाचे ठरविल्यास दोन वस्तूचे निरनिराळे संच दर्शविता येतील. या प्रत्येक संचापासून मिळणारे समाधान सारखेच असेल. असे संच दर्शविणारा तटस्थता तक्ता तयार करून त्या आधारे आकृतीसह स्पष्टीकरण करावे. गृहिते थोडक्यात लिहावीत.

३) **पुरवठ्याची लवचिकता ठरविणारे घटक सांगा.**

किंमतीत होणाऱ्या बदलामुळे पुरवठ्याच्या प्रमाणात जे कमी – जास्त बदल होतात त्या बदलांच्या प्रमाणाला पुरवठ्याची लवचिकता म्हणतात, या व्याख्येचे सूत्र, उदाहरणासह स्पष्टीकरण आवश्यक. पुरवठ्याची लवचिकता स्पष्ट करताना पुढील घटक स्पष्ट करावेत. कालखंड, व्यवसाय संस्थांचे आगमन व निर्गमन, उत्पादनाचे घटक आकृष्ट करण्याची क्षमता, वस्तू – सेवेच्या मागणीची लवचिकता इ.

४) **दीर्घकालीन खर्च वक्र संकल्पना स्पष्ट करा.**

दीर्घकाळात उत्पादन संस्था उत्पादनाचे सर्व घटक बदलू शकते. या बाबतचे स्पष्टीकरण, दीर्घकालीन एकूण खर्चाला एकूण उत्पादनाने भागले असता दीर्घकालीन सरासरी खर्च काढता येतो. अल्पकालीन सरासरी खर्च वक्राच्या सहाय्याने दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र कसा काढता येतो याबाबतची आकृती व तिचे स्पष्टीकरण.

**प्रश्न ३ टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

१) **मक्तेदारीचे प्रकार.**

बाजारात पर्यायी वस्तूंचा अभाव असलेली अवस्था म्हणजे मक्तेदारी होय. ही व्याख्या व तिचे थोडक्यात स्पष्टीकरण. प्रकार स्पष्ट करताना उदाहरणासह पुढील प्रकार स्पष्ट करावेत. नैसर्गिक मक्तेदारी, सामाजिक मक्तेदारी, कायदेशीर मक्तेदारी, ऐच्छिक मक्तेदारी, वित्तीय मक्तेदारी, नावलौकिक मक्तेदारी, इ.

२) **वस्तूभेद करण्याचे मार्ग.**

वस्तूभेदाची एक व्याख्या लिहून थोडक्यात स्पष्टीकरण. मार्ग स्पष्ट करताना उदाहरणासह पुढील मुद्यांचे प्रत्येकी चार – पाच ओळींमध्ये विश्लेषण करावे. वस्तूच्या गुणात्मक दर्जात बदल, व्यापारी नांव – चिन्हाचा वापर, पूरक सेवांचा पुरवठा, खास युक्तीचा वापर, प्रभावी विक्री कौशल्य, जाहिरात, वस्तूंमध्ये सुधारणा करणे. इ.

३) **अल्पाधिकार बाजारपेठेची वैशिष्ट्ये.**

अल्पाधिकार बाजारपेठ म्हणजे जेथे काही थोडेच विक्रेते अस्तित्वात असतात अशी बाजारपेठ. या व्याख्येचे थोडक्यात स्पष्टीकरण. पुढील मुद्दे वैशिष्ट्ये म्हणून स्पष्ट करावेत. परस्परावलंबित्व, अनिश्चित स्वरूपाचा मागणी वक्र, उद्योगसंस्थांच्या परस्परविरोधी प्रवृत्ती, मक्तेदारीचा अंश, किंमती ताठर असतात इ.

४) **श्रमाची वैशिष्ट्ये.**

श्रम हा उत्पादनाचा घटक इतर घटकांपेक्षा वेगळा आहे. वैशिष्ट्ये स्पष्ट करताना पुढील मुद्दे स्पष्ट करणे आवश्यक. श्रम म्हणजे मानवी घटक, सजीव घटक, योग्य वागणूक तर कार्यक्षमतेत वाढ, श्रम व श्रमिक

अविभाज्य, कार्यक्षमतेवर अनेक घटकांचा परिणाम, नाशवंत, सौदाशक्ती कमी पडल्यास पिळवणूक, प्रत्येक श्रमिकाची कार्यक्षमता वेगवेगळी असते, गतीक्षमता मर्यादित असते, पुरवठा अचानक वाढविता येत नाही, श्रमाचा साठा शक्य नसतो, श्रम सजीव घटक म्हणून काही सामाजिक प्रश्न निर्माण होऊ शकतात.

**प्रश्न ४ बदलत्या प्रमाणांचा सिद्धान्त आकृतीसह स्पष्ट करा.**

'तुलनात्मकदृष्ट्या काही घटकांची गुंतवणूक स्थिर असताना जर इतर काही घटकांचे गुंतवणुकीचे प्रमाण वाढविले तर उत्पादनात वाढ होईल. मात्र विशिष्ठ मर्यादा गाठल्यानंतर गुंतवणुकीत त्याच प्रमाणात वाढ केली तरी उत्पादन वाढीचा दर घटत जाईल', हा सिद्धान्त लिहून थोडक्यात स्पष्टीकरण करावे.

नंतर सिद्धान्ताची गृहिते लिहावीत.

अल्पकाळात काही उत्पादनघटक स्थिर व काही बदलत्या प्रमाणात वापरले असता, होणाऱ्या परिणामांचे तीन टप्पे वर्णन करावेत. त्याआधारे आकृती काढून आकृतीचे स्पष्टीकरण करावे. तीन टप्प्यात आढळणाऱ्या प्रवृत्तीचे स्पष्टीकरण करावे.

**प्रश्न ५ विभाजनाचा सीमांत उत्पादनक्षमता सिद्धान्त स्पष्ट करा.**

उत्पादन घटकांचे मोबदले कसे ठरतात हे सांगण्याचा प्रयत्न, अनेक अर्थतज्ज्ञांचा सहभाग.सीमांत उत्पादनक्षमतेबाबत थोडक्यात विश्लेषण. उत्पादक किंवा उत्पादन संस्था, उत्पादन घटकांचा वापर करीत असताना उत्पादन घटकांचे प्रमाण किती वापरेल व त्यांना किती मोबदला देईल हे सीमांत उत्पादनक्षमतेच्या सिद्धान्तात सांगितले आहे. नंतर सिद्धान्ताची गृहीते लिहावीत.

सिद्धान्ताचे स्पष्टीकरण देऊन आकृती काढावी. आकृतीचे वर्णन लिहावे. सिद्धान्ताचे थोडक्यात परीक्षण करावे.

## विकासाचे अर्थशास्त्र (ES-2)

**प्रश्न १) पुढील प्रश्नांची प्रत्येकी ८ – १० ओळीत उत्तरे लिहा.**

१) **आर्थिक विकासाची व्याख्या सांगा.**

विकसनशील अर्थव्यवस्थेत दीर्घकाळात वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास होय. ही व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण.

२) **भांडवलनिर्मितीचा अर्थ सांगा.**

समाज, चालू काळातील सर्वच उत्पादक शक्ती आजच्या इच्छा व गरजा भागविण्यासाठी वापरीत नाही तर त्यापैकी काही भाग भांडवली वस्तू निर्माण करण्यासाठी वापरतो. उत्पादक प्रयत्नांची कार्यक्षमता वाढविणारी यंत्रे – अवजारे – हत्यारे – वाहतूक साधने – कारखाने इ. वास्तव भांडवलाच्या निर्मितीसाठी काही उत्पादक शक्ती वापरली जाते. अशाप्रकारे भविष्यकाळात उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढविणे शक्य व्हावे म्हणून चालू काळातील उपलब्ध साधनसामग्रीपैकी काही भाग भांडवली वस्तूंचा साठा वाढविण्यासाठी वापरणे म्हणजे भांडवल निर्मिती होय. थोडक्यात स्पष्टीकरण.

३) **प्रवर्तक कोणास म्हणतात?**

अभिनव प्रक्रिया ज्याच्यामुळे शक्य होते तो प्रवर्तक. इतरांपेक्षा वेगळे कार्य. श्रमिक – भांडवलदार – संयोजक हे प्रवर्तक असतीलच असे नाही. मात्र प्रवर्तक हा श्रमिक – भांडवलदार – संयोजक यापैकी कोणीही असू शकतो. याबाबतचे स्पष्टीकरण.

४) **पुरोगामी जोडणी परिणामाचा अर्थ सांगा.**

एखाद्या विशिष्ट गुंतवणूकीमुळे ज्या उत्पादनापासून त्यानंतरच्या अवस्थांमधील उत्पादनाला प्रेरणा मिळते तो पुरोगामी जोडणी परिणाम असतो. उदाहरण देऊन स्पष्टीकरण करावे.

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची २५ – ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) **आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यातील फरक सांगा.**

वरवर पाहता विकास आणि वृद्धी या दोन्ही शब्दात समानता दिसते. मात्र सूक्ष्म फरक. कोणतीही एक व्याख्या लिहून आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यातील फरक स्पष्ट करावा.

२) **विकासाचे आर्थिक घटक स्पष्ट करा.**

देशाच्या विकासासाठी देशातील उपलब्ध साधनांना आर्थिक घटकांची मदत झाली कि विकासाची प्रक्रिया हळूहळू वेग घेऊ लागते. विकासाचे आर्थिक घटक स्पष्ट करताना पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्टीकरण करावे. उपलब्ध साधनांचा पर्याप्त वापर, विविध क्षेत्रांसाठी साधनांची आदर्श विभागणी, उत्पादन सीमा वाढविणे, भांडवल, संयोजन कौशल्य, तंत्रज्ञान इ.

३) **विकसनशील देशात बचतीचा दर कमी का असतो?**

विकसनशील देशात बचतीचा दर फारच कमी आढळतो, याविषयीची कारणे स्पष्ट करताना पुढील मुद्दे प्रत्येकी तीन – चार ओळीत स्पष्ट करावेत. गरिबी, बँका व वित्तीय संस्थांचा अभाव, विकसित राष्ट्रांची स्पर्धा, राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा मंद वेग, मागासलेपणा, दिखाऊ खर्च, किंमत वाढ, आर्थिक विषमता इ.

४) **तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करा.**

तंत्रज्ञान म्हणजे कोणतेही पद्धतशीर ज्ञान जे शास्त्रीय प्रयोग अथवा/आणि सिद्धान्तावर आधारित असते आणि ज्याच्यामुळे समाजाची वस्तू व सेवा निर्मितीची क्षमता वाढते. ही व्याख्या स्पष्ट करून पुढील मुद्यांच्या आधारे महत्त्व स्पष्ट करावे. उत्पादन घटकांच्या प्रमाणात वाढ न करता उत्पादन वाढ, कार्यक्षमतेत वाढ, टंचाईवर मात, वाढीसाठी सहाय्य इ.

**प्रश्न ३) टीपा लिहा (कोणत्याही दोन)**

१) **विकासाचे आर्थिकेतर घटक.**

देशाच्या विकासासाठी देशातील उपलब्ध साधनांना काही आर्थिकेतर घटकांची मदत झाली कि विकासाची प्रक्रिया हळूहळू वेग घेऊ लागते. विकासाचे आर्थिकेतर घटक स्पष्ट करताना पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्टीकरण करावे. अ) राजकीय घटक – राजकीय स्थैर्य, प्रशासकीय कार्यक्षमता, नेतृत्व इ. ब) सामाजिक व सांस्कृतिक घटक – रूढी परंपरा, लोकसंख्या, राष्ट्रीय एकात्मता, संस्था इ.

२) **मानवी संसाधनांचा विकास.**

अनेक विकसनशील देशात लोकसंख्या वाढ ही एक मोठी समस्या. मात्र त्याचवेळी जास्त लोकसंख्येच्या दुसऱ्या बाजूचाही विचार करणे आवश्यक, श्रमशक्तीची उपलब्धता. जर गुणवत्ता जास्त तर विकासाला मोठा हातभार. गुणवत्ता वाढीसाठी पुढील गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते. शिक्षण, आरोग्य, पोषण इ. या मुद्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करावे.

३) **परकीय मदतीचे स्वरूप.**

परदेशातील खाजगी संस्था, सरकार, आंतरराष्ट्रीय संस्था यांच्यामार्फत भांडवल व इतर स्वरूपात परकीय मदत विकसनशील देशांना दिली जाते. स्वरूप स्पष्ट करताना पुढील मुद्यांच्या आधारे विश्लेषण करावे. अनुदाने, सुलभ कर्जे, तांत्रिक मदत, वस्तूस्वरूपात मदत, खासगी भांडवल, परकीय सहयोग, विदेशी सरकारचे कर्ज, आंतराष्ट्रीय कर्जे व मदत इ.

४) **अतिउपभोगावस्था.**

रोस्टोव यांनी आपला विकासाच्या अवस्थांचा सिद्धान्त मांडलेला आहे. या सिद्धान्तातील अतिउपभोगावस्था ही शेवटची अवस्था त्यांनी स्पष्ट केली आहे. या अवस्थेत दिसून येणाऱ्या तीन गोष्टी स्पष्ट करणे आवश्यक. अतिउपभोगावस्था प्राप्त करणाऱ्या देशाचे उदाहरण देणे आवश्यक.

**प्रश्न ४ आर्थिक विकासाच्या मार्गातील अडथळे स्पष्ट करा.**

प्रत्येक राष्ट्रातील भौगोलिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती, परंपरा, विचार भिन्न असल्याने आर्थिक विकासाच्या मार्गात सर्वच विकसनशील देशांना कमी – जास्त प्रमाणात अडथळ्यांना तोंड द्यावे लागते.

अडथळे स्पष्ट करताना पुढील मुद्यांचा आधार घेऊन उदाहरणासह सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. परकीय राजवटीचा परिणाम, बाजाराची अपूर्णता, दुष्टचक्रांचे अस्तित्व, भांडवलाची कमतरता, सामाजिक व सांस्कृतिक अडथळे, आंतरराष्ट्रीय घटक इ.

**प्रश्न ५ आर्थिक विकासातील शासनाची भूमिका स्पष्ट करा.**

आर्थिक विकासात प्रत्येक देशाच्या सरकारला काही प्रत्यक्ष तर काही अप्रत्यक्ष कार्ये करावी लागतात. पुढील कार्ये सविस्तरपणे स्पष्ट करणे आवश्यक – सामाजिक आणि आर्थिक सुविधा, समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्तीत बदल घडविणे, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब नियोजन, शेतीचा विकास, सुधारणा, वेतनधोरण, वित्तीय धोरण, चलनविषयक धोरण इ.

❁❁❁

# (समाजशास्त्र)
# (<u>SOCIOLOGY</u>)

## <u>समाजशास्त्रीय विचारवंत (SS – 1 )</u>

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

१) **सामाजिक विचारांची वैशिष्ट्ये लिहा.**

१) सामाजिक विचारांची निर्मिती सामाजिक समस्या सोडविण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नातून समाजाचे नियोजन, विविध प्रक्रियांचे व समाजाचे स्वरुप समजावून घेण्यामधून २) परिस्थिती सापेक्ष ३) मानवी प्रगतीचे निदर्शक.

२) **कॉम्ट यांचे स्त्रीविषयक विचार मांडा**

१) स्त्रियांचा विकास हाच समाजाचा विकास २) स्त्रियांना आर्थिक व शिक्षण स्वातंत्र्य द्यावे.
३) स्त्रियांनी नीतिमान राहून इतरांनाही असे वागण्यास प्रवृत्त करावे. ४) राजकारण हे स्त्रियांचे क्षेत्र असू नये.

३) **स्नेन्सरने औद्योगिक समाजाची सांगितलेली वैशिष्ट्ये लिहा.**

ऐच्छिक सहकार्य, व्यक्तिस्वातंत्र्य, दडपशाहीला वाव नाही. ऐच्छिक संघटनावर भर.

४) **सोरोकीन यांनी मांडलेले संस्कृतीचे कोणतेही दोन प्रकार लिहा.**

१) चेतनात्मक संस्कृती २) भावनात्मक संस्कृती ३) आदर्शात्मक संस्कृती.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा.**

१) **मार्क्सचे वर्गविषयक विचार स्पष्ट करा.**

१) सामाजिक वर्गाचा उगम कसा होतो. २) आधुनिक समाजातील वर्ग ३) वर्गजाणीव व वर्गसंघर्ष कसा होतो.

२) **डरखीमचा धर्माचा सिध्दांत स्पष्ट करा.**

टायलर व मॅक्समुल्लरचे विचार, धर्म एक सामाजिक तथ्य, धर्माची व्याख्या, पवित्र –अपवित्र, श्रध्दा, चालीरीती, कुलप्रतिकवाद या मुद्यांचे स्पष्टीकरण.

३) **वेबरने मांडलेले अधिकारांचे प्रकार स्पष्ट करा.**

१) तर्कसंगत कायदेशीर अधिकार २) पारंपारिक अधिकार ३) दैवी गुणांमुळे मिळणारे अधिकार.

४) **सोरोकीनचे सामाजिक आंतरक्रियांचे प्रकार स्पष्ट करा.**

**प्रकार** – १) कौटुंबिक संबंध २) करारात्मक संबध ३) सक्तीचे संबंध

**प्रश्न ३. टीपा लिहा (कोणत्याही दोन )**

१) **डरखीमचे आत्महत्येचे प्रकार.**

१) आत्मकेंद्रीत आत्महत्या २) परार्थवादी आत्महत्या ३) प्रमाणकशून्य आत्महत्या.

२) **भारतातील धर्माबाबत वेबरचे विचार.**

पाश्चात्य समाजाप्रमाणे भारतात भांडवलशाहीचा विकास नाही. याची कारणे - हिंदू धर्मातील जाति व्यवस्था, कर्मकांडाचे महत्व, पारलौकिकतेवर भर.

३) **परेटो यांचे भ्रांत तर्काचे प्रकार.**

१) घोषणा २) अधिकार ३) भावनांना अनुरुप अशी विधाने ३) तोंडी पुरावा.

४) **सोरोकीनचे क्रांतीच्या संदर्भातील विचार**.

सामाजिक क्रांती ही नैसर्गिक बाब नाही, त्यामुळे समाजाचे कल्याण होण्याची शक्यता कमी, क्रांती हा परिवर्तन प्रक्रियेतील बाह्य घटक त्यामुळे बरेचदा हे परिवर्तन घातक, क्रांतीमुळे सामाजिक ऐक्य,प्रगती, व्यक्तिविकासात अव्यवस्था निर्माण होते

**प्रश्न ४. ऑगस्ट कॉम्ट यांचा मानवी समाजाच्या प्रगतीचा नियम स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक** - तीन अवस्थांचा नियम वा मानवी प्रगतीचा नियम याबाबतचे विचार मांडून कॉम्ट यांनी समाजशास्त्रात वैशिष्टयपूर्ण भर घातली. मानवी बुध्दिमत्तेशी निगडीत असलेली प्रत्येक ज्ञानशाखा विकसित होत असताना ती प्रामुख्याने तीन वेगवेगळ्या परंतु एकानंतर एक अशा विशिष्ट क्रमाने तात्विक अवस्थांमधून मार्गक्रमण करते. या तीन **अवस्था** - १) ईश्वरशास्त्रीय / असत्य अवस्था - या अवस्थेच्या तीन उपअवस्था - **अ)** सर्व वस्तू चेतनावाद **आ**) अनेकेश्वरवाद **इ**) एकेश्वरवाद २) अध्यात्मिक / अमूर्त अवस्था ३) वैज्ञानिक / प्रत्यक्ष अवस्था.

**प्रश्न ५. चार्लस कूले यांनी मांडलेल्या ' प्रतिबिंबित स्व:त्वाची कल्पना ' आणि ' प्राथमिक समूह ' या संकल्पना स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक** - तत्वज्ञान आणि मानसशास्त्र या दोन शास्त्रांचा योग्य समन्वय कूलेंनी आपल्या समाजशास्त्रीय विचारात साधला. कूलेंच्या मते व्यक्तीच्या ' **स्व** ' ची उभारणी इतरांशी होणाऱ्या पारस्पारिक क्रियांमधून होत असते. स्वत:बद्दलची कल्पना अथवा स्वत:विषयक मूल्यमापन प्रतिबिंबित स्वत्वाच्या कल्पनेतून कूलेंनी मांडले आहे. १) आपण दुसऱ्या व्यक्तीला कोणत्या स्वरुपात दिसतो यासंबंधी व्यक्तीने मनात आडाखे बांधणे २) समोरची व्यक्ती आपल्यासबंधी कोणत्याप्रकारे मत बनविते याची कल्पना मनात योजणे. ३) वरील प्रक्रियांमधून व्यक्तीच्या मनात स्वत:बद्दलची एक प्रतिमा, मूल्यमापनात्मक प्रतिक्रया तयार होते. स्वत: संबंधीचा अभिमान, आत्मविश्वास अथवा कमीपणाची भावना यातूनच घडत जाते. प्रतिबिंबित स्वत्व व प्राथमिक समूह परस्परसंबंध - इतरांच्या मतासंबंधी कदर ठेवणे व त्यानुसार **' स्व '** विषयीचे परीक्षण करणे यामुळे प्राथमिक समूहजीवनास पोषक, सुसंस्कारित असे जीवन प्रतिबिंबित स्वत्वाच्या कल्पनेतून साकार.

## <u>ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र (SS 2)</u>

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

१) **इंग्रज शासन काळातील ग्रमीण समाजाचे स्वरुप स्पष्ट करा.**

हा काळ ग्रामीण समाजातील परिवर्तनाचा, शेतीमध्ये व्यापारी दृष्टीकोन, जमीनदारी पध्दत, मोठमोठया गिरण्या-कारखान्यांची निर्मिती इ. बदल.

२) **"शहर" म्हणजे काय ?**

विलकॉक्स, बर्गल यांची शहराची व्याख्या, नागरी समुदाय म्हणजे काय, याचे स्पष्टीकरण.

३) **ग्रामीण भागात कुटुंब मोठे असण्याची कारणे सांगा.**

ग्रामीण स्त्रियांचे विवाह तुलनेने लवकर, त्यामुळे मुलांची संख्या अधिक, शेती हा प्रमुख व्यवसाय.

४) **जादूची वैशिष्ट्ये लिहा.**

हेतूप्रधानता, क्रिया, साधनांची आवश्यकता, जादूगाराचा एक विशिष्ट दर्जा.

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन )**

**१) ग्रामीण समाजशास्त्राचे महत्व स्पष्ट करा.**

**ग्रामीण समाजशास्त्राचे महत्व स्पष्ट करणारे मुद्दे :-**

१) कृषिव्यवसायातील मागासलेपणा. २) ग्राम - भारतीय संस्कृतीचे उगमस्थान. ३) सांस्कृतिक विविधता. ४) ग्प्रमीण समस्या. ५) नियोजन कार्यक्रम.

**२) एव्हरेट ली चा स्थलांतराचा नियम विषद करा.**

एव्हरेट ली यांनी सांगितलेले चार महत्वाचे घटक, निर्गमन व आगमन या संकल्पनांशी संबंधित स्थलांतराचे परिणाम - लोकसंख्याशास्त्रीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिणाम.

**३) संयुक्त कुटुंबात बदल घडवून आणणारे घटक कोणते ?**

औद्योगिकीकरण, नागरीकरण, इतर घटक - पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव.

**४) स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील भूमिव्यवस्था स्पष्ट करा.**

रयतवारी पध्दत, महालवारी पध्दत, जमीनदारी पध्दत.

**प्रश्न ३. टीपा लिहा (कोणत्याही दोन)**

**१) औद्योगिकीकरणपूर्व नगरांची वैशिष्ट्ये.**

मर्यादित आकार, सामाजिक एकजिनसीपणा, मोठ्या उद्योगधंद्यांचा अभाव, अपुरी वाहतुक व दळणवळण व्यवस्था, आर्थिक उलाढालीचे अल्प प्रमाण, सामाजिक समस्यांचे अल्प प्रमाण, सामाजिक गतिशिलतेचे अल्प प्रमाण, सामाजिक विषमतेचे कमी प्रमाण, भांडवलदार वर्गाचे प्रमाण कमी.

**२) विसाव्या शतकातील जलद नागरीकरणास कारणीभूत घटक.**

औद्योगिक क्रांती, व्यापारी क्रांती, शेती क्रांती, दळणवळण व वाहतूक साधनात झालेली वाढ, राजकीय घटक, शैक्षणिक केंद्र, लोकसंख्येची वाढ, सुरक्षितता, शहर सुधारणा व मनोरंजन.

**३) आधुनिक कुटुंबाची वैशिष्ट्ये** - मर्यादित आकार, प्रजोत्पादन, व संतती संगोगपनाबाबतचा वेगळा दृष्टिकोन, आर्थिक गरजांची पूर्तता, धार्मिकतेचे कमी प्रमाण, लहान समूहाचे लाभ.

**४) नागरी समाजातील धर्मसंस्थेचे स्वरुप**.

धर्मातील कर्मठपणा, कर्मकांड, अंधश्रध्दा, धर्मभोळेपणा नागरी समाजातून नाहीसा होत आहे. धर्माचे अस्तित्व कायम पण त्याच्या स्वरुपात बदल, धर्माचा प्रभाव टिकून.

**प्रश्न ४. ग्रामीण आणि नागरी समुदायातील फरक विशद करा.**

**प्रास्ताविक** - सोरोकीन व झिम्मरमन यांनी आपल्या ' नागरी - ग्रामीण समाजशास्त्राची मूलतत्वे' या पुस्तकात ग्रामीण व नागरी समुदायातील फरक काही तत्वे गृहीत धरुन स्पष्ट केला आहे. व्यवसाय, पर्यावरण, समुदायाचा आकार, लोकसंख्येची घनता, सजातीयता आणि विजातीयता, सामाजिक भेद आणि स्तरीकरण, सामाजिक गतिशीलता, सामाजिक आंतरक्रिया या तत्वांच्या आधारे फरक स्पष्ट करता येईल.

**प्रश्न ५. सहकाराची वैशिष्टये सांगून भारतातील सहकार चळवळीच्या यशापयशाची चर्चा करा.**

**प्रास्ताविक** - सहकाराचे तत्व नवे नाही. एकत्र राहाणे, एकत्र काम करणे ही मानवी जीवनाची एक सहजप्रवृत्ती आहे.

**वैशिष्टये** - १) व्यक्तींचा सहयोग २) खऱ्या एकोप्याने काम ३) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांची संस्था ४) लोककल्याणासाठी संस्था कार्यरत त्यामुळे सेवाभावाला प्राधान्य ५) सामाजिक विषमता नाही. ६) आदर्श नितीमूल्यांना महत्व. ७) सामाजिक परिवर्तनाची चळवळ.

**सहकार चळवळीचे यश** - १) आर्थिक लाभ २) माफक दरात कर्ज उपलब्ध ३) समाजिक व नैतिक लाभ ४) शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील यश.

**सहकार चळवळीचे अपयश** - १) सामान्य लोकांपासून दूर २) स्वावलंबनाचा अभाव. ३) सार्वजनिक संपत्तीचा गैरवापर ४) सहकारी संस्थेचे नेतृत्व ५) अकार्यक्षम व्यवस्थापन ६) सुशिक्षित बुध्दिमान लोकांचा अभाव ७) थकबाकीचे प्रमाण जास्त ८) यशासाठी आवश्यक असणाऱ्या परिस्थितीचा अभाव ९) उदासिनता

# (इतिहास)
# (HISTORY)

## प्राचीन भारत (इ.स. १२०० पर्यंत) (HS - 1)

**टीप :** **१. उत्तरामध्ये सनावळ्यांवर भर नको.**

**२. प्रस्तावना व समारोपाचे येथे केवळ मुद्दे दिलेले आहेत. त्यांचा विस्तार पुस्तकात पाहून आपण करू शकता.**

**३. प्रस्तावना व समारोप नमुन्यादाखल दिले असून उत्तरास अनुरूप वेगळी प्रस्तावना व समारोप लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १ खालील प्रश्नांची ८ ते १० वाक्यात उत्तरे लिहा.**

**१) सिंधू संस्कृतीतील गृहरचनेची माहिती द्या.**

प्रस्तावना - सिंधू संस्कृतीचा शोध कधी लागला?

गृहरचना - दुमजली घरे, मध्यभागी चौक, बांधकाम साहित्य, भक्कमता सुरक्षितता, स्नानगृहे, बंद गटारे.

समारोप - एका वाक्यात सिंधू संस्कृतीच्या विनाशाच्या कारणांची यादी देणे.

**२) बौध्द व जैन विचारप्रवाहांचा कोणता प्रभाव समाजावर पडला?**

प्रस्तावना - बौध्द व जैन धर्माचे प्रवर्तक कोण?

प्रभाव - अहिंसेचा पुरस्कार, कर्मकांडावरील भर कमी, समानता व सहिष्णुता, लोकभाषांचे महत्त्व वाढले.

समारोप - बौध्द व जैन धर्मांचा प्रसार जोमाने का झाला ?

**३) संगम कालखंड म्हणजे काय?**

प्रस्तावना - इ.स.पूर्व ५०० ते इ.स. ५०० हा हजार वर्षांचा कालखंड दक्षिण भारताच्या इतिहासात संगम कालखंड म्हणून ओळखला जातो. संगम कालखंड - संगम - तमीळ साहित्याच्या सभा, तमीळ साहित्याच्या प्रभावाचा कालखंड, या या साहित्यातून तत्कालीन परिस्थितीवर प्रकाश, या कालखंडाचे विशेष - अंतर्गत संघर्ष, अन्य देशांशी संबंध.

समारोप - या कालखंडातील प्रमुख सत्ता कोणत्या?

**४) इस्लामी आक्रमणांचे कोणते परिणाम भारतावर झाले?**

प्रस्तावना - भारतात इस्लामी आक्रमणांची सुरूवात इ.स.च्या आठव्या शतकात झाली.

परिणाम- संपत्तीची लूट, धार्मिक अत्याचार, हिंदूंवर अन्यायकारक कर, सहकार्य, सांस्कृतिक आदानप्रदान, व्यापारवाढ.

समारोप - या आक्रमणांमधूनच भारतात मध्ययुगामध्ये इस्लामी सत्ता प्रस्थापित झाली.

**प्र. २ खालील प्रश्नांची २५ ते ३० वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)**

**१) भारताच्या प्राचीन इतिहासाच्या भौतिक/पुरातत्त्वीय संदर्भसाधनांची माहिती लिहा.**

प्रस्तावना - इतिहासाची संदर्भ साधनांचे चार प्रकार कोणते?

भौतिक साधने - अवशेष, स्मारके, नाणी, आलेख, ताम्रपट, शिलालेख.

समारोप - भौतिक साधने समकालीनता व विश्वसनीयतेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरतात.

**२) कुशाणांविषयी माहिती लिहा.**

प्रस्तावना - कुशाण हे मौर्योत्तर काळातील महत्त्वपूर्ण राजघराणे होते.

कुशाण - मूळ स्थान, सम्राट कनिष्क, व्यापाराची भरभराट, बौध्द धर्माचा प्रसार, ऱ्हास.

समारोप - नंतरच्या काळात उत्तर भारतात गुप्तांचे बलाढ्य साम्राज्य उदयाला आले.

**३) कला, स्थापत्य व धार्मिक क्षेत्रातील चालुक्यांच्या योगदानाचा आढावा घ्या.**

प्रस्तावना - चालुक्य घराण्याची सत्ता इ.स.च्या सहाव्या शतकात कर्नाटकात उदयाला आली. या घराण्याचे राज्य दोन कालखंडात विभागलेले दिसते.

योगदान - शिक्षण, वाङ्मय व कला व स्थापत्य.

समारोप - चालुक्यांची कारकीर्द त्यांच्या सांस्कृतिक योगदानाने महत्त्वपूर्ण ठरली.

४) **पाल, प्रतिहार आणि राष्ट्रकूट यांची माहिती देऊन त्यांच्यातील संघर्षाची माहिती द्या.**

प्रस्तावना – प्राचीन भारताचे अखेरचे पर्व गाजले ते विविध संघर्षांमुळे. त्यातील एक संघर्ष म्हणजे पाल, प्रतिहास व राष्ट्रकूट यांच्यातील संघर्ष. तिन्ही सत्तांची थोडक्यात माहिती (स्थान, महत्त्वाचे राजे, योगदान) संघर्षाची कारणे – राजकीय पोकळी व आर्थिक सामर्थ्य प्राप्त करणे, शेवटी विजय प्रतिहारांचा.

समारोप – या संघर्षाखेरीज रजपुतांचा परस्पर संघर्ष आणि इस्लामी आक्रमकाशी उद्भवलेला एद्देशीयांचा संघर्ष यामुळे जनजीवन अस्थिर झाले.

**प्र. ३ खालील टिपा २५ ते ३० वाक्यात लिहा. (कोणत्याही दोन)**

१) **आर्यांचे राजकीय जीवन**

प्रस्तावना – आर्यांच्या मूळ वसतिस्थानाबाबत अनेक मतमतांतरे असली तरी आर्यांनी भारतात एक महान संस्कृती जन्माला घातली एवढे मात्र खरे.

राजकीय जीवन – टोळी पध्दती, वंशशाखा, राजा, गणराज्य, राजाची कर्तव्ये, बळी, धार्मिक व नैतिक बंधने, प्रशासन.

समारोप – आर्यांनी राजकीय क्षेत्राखेरीज सामाजिक, धार्मिक व साहित्य क्षेत्रातही महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.

२ ) **राष्ट्रकुटांचे योगदान**

प्रस्तावना –राष्ट्रकुटांचा उदय कधी व कोठे ?

राष्ट्रकूट – ज्ञान,विज्ञान, शिक्षण, साहित्य यांना उत्तेजन, वास्तुकला व शिल्पकला यांचा प्रसार–लेणी.

समारोप – राष्ट्रकूट घराण्याचा शेवट गुर्जर–प्रतिहारांकडून.

३) **रजपुतांचा उदय व संघर्ष**

प्रस्तावना – रजपूतांची सत्ता ही प्राचीन काळातील एक महत्त्वाची सत्ता होती. उदयाचा कालखंड प्रमुख घराणी, योगदान, संघर्ष – परस्परात, प्रतिहार, राष्ट्रकूट व चालुक्यांशी, इस्लामी आक्रमकांशी.

समारोप – रजपूतांनी भारताच्या मध्ययुगीन इतिहासावरही आपला ठसा उमटविला.

४) **विस्तीर्ण भारत**

प्रस्तावना – प्राचीन भारताच्या संदर्भात विस्तीर्ण भारत अशी एक प्रचलित आहे. प्राचीन भारताचा जागतिक संदर्भ स्पष्ट करणारी अशी ही संकल्पना आहे. व्यापार व राजकीय विस्तार यामुळे परदेशांशी संबंध, संबंधित देशराजसत्ता, धर्म, स्थापत्य, साहित्य, ज्ञान विज्ञान यांचे संक्रमण.

समारोप – थोडक्यात प्राचीन काळात भारताचा जो व्यापारी, राजकीय व प्रामुख्याने सांस्कृतिक अनुषंगाने जागतिक पातळीवर विस्तार झाला त्याला अनुलक्षून साकल्याने विस्तीर्ण भारत अशी संज्ञा वापरली जाते.

**प्र. ४ सम्राट अशोकाच्या कारकिर्दीचे वर्णन करा.**

प्रस्तावना – अशोकाचा थोडक्यात परिचय

सम्राट अशोक – साम्राज्यविस्तार, कलिंग युध्द, बौध्द धर्माचा स्वीकार व प्रसार, सदाचरणावर भर, प्रजाहितदक्षता, कला व विद्यांना आश्रय, योग्यता.

समारोप– अशोकानंतरची मौर्य साम्राज्याची पडझड (३ ते ४ वाक्यात लिहा.)

**प्र. ५ प्राचीन भारतातील सरंजामशाहीचे वर्णन करा.**

प्रस्तावना – खरे पाहाता सरंजामशाही ही मध्ययुगातील महत्त्वपूर्ण राजकीय व सामाजिक संस्था होती. युरोपप्रमाणेच भारतातही ही व्यवस्था प्रचलित होती. भारतात या व्यवस्थेचा जन्म प्राचीन काळातच झालेला दिसून येतो.

प्राचीन भारतातील सरंजामशाही अथवा सामंतशाही –

मांडलिक व्यवस्था – हेतू व पध्दती

सामाजिक व धार्मिक सामंतशाही

समारोप – मध्ययुगामध्ये नवी राज्ये व साम्राज्ये स्थापन होताना प्राचीन सरंजामशाहीचा काही अंशी राजकीय सरंजामशाहीचे स्वरूप काहीसे बदलत गेले. तसेच प्राचीन भारतातील सरंजामशाहीचे स्वरूप मध्ययुगीन

युरोपातील सरंजामशाहीपेक्षाही भिन्न होते.कारण मुळातच प्राचीन भारतातील सरंजामशाहीच्या उदयामागील प्रेरणा व गरजा यांचे स्वरूपच मध्ययुगीन राजकीय प्रेरणांपेक्षा वेगळे होते.

## मराठ्यांचा इतिहास (इ.स. १६३० ते १८१८) (HS - 2)

**टीप :** **१. उत्तरामध्ये सनावळ्यांवर भर नको.**

**२. प्रस्तावना व समारोपाचे येथे केवळ मुद्दे दिलेले आहेत. त्यांचा विस्तार पुस्तकात पाहून आपण करू शकता.**

**३. प्रस्तावना व समारोप नमुन्यादाखल दिले असून उत्तरास अनुरूप वेगळी प्रस्तावना व समारोप लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १ खालील प्रश्नांची ८ ते १० वाक्यात उत्तरे लिहा.**

**१) वारकरी चळवळ स्वराज्यस्थापनेला कशा प्रकारे पूरक ठरली?**

प्रस्तावना - एका वाक्यात वारकरी संप्रदायाची ओळख द्यावी. स्वराज्याला पूरक कार्य समता व ऐक्याचा पुरस्कार, मराठीला लोकप्रियता व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, मराठीची अस्मिता टिकविली. त्यामुळे स्वराज्यास प्रेरणा व अधिष्ठान (उदाहरणे अपेक्षित)

समारोप - आजच्या वारकरी संप्रदायाकडून यापैकी कोणते कार्य होते?

**२) शिवाजीमहाराजांच्या दुसऱ्या राज्याभिषेकावर टीप लिहा.**

प्रस्तावना - दुसरा राज्याभिषेक शिवाजीमहाराजांनी कधी करून घेतला?

दुसरा राज्याभिषेक तांत्रिक पध्दतीने करण्यामागील कारणे, तांत्रिक पध्दतीचा राज्याभिषेक कधी व कस.

समारोप - राज्याभिषेकांमुळे काय साध्य झाले?

**३) चिमाजीअप्पाच्या कामगिरीचे महत्त्व लिहा.**

प्रस्तावना - चिमाजी अप्पा कोण होता? चिमाजीअप्पाच्या कामगिरीचे महत्त्व - उत्तरेतील चढाया, सिद्दी व पोर्तुगिजांविरुध्द यशस्वी मोहिमा

समारोप - चिमाजी अप्पाच्या कामगिरीने बाजीराव पेशव्याच्या सत्ताविस्ताराला हातभार लागला.

**४) पानिपतच्या तिसऱ्या युध्दाचे परिणाम लिहा.**

प्रस्तावना - पानिपतचे तिसरे युध्द कोणात व कधी झाले?

युध्दाचे परिणाम - मराठ्यांची मानहानी, प्राणहानी, वित्तहानी, अब्दालीची माघार, मराठे व मुस्लिम सत्ता दुर्बल - इंग्रजांचा फायदा, नानासाहेबाचा मृत्यू व पेशवाईच्या वारश्याचा मृत्यू यामुळे सरदार स्वतंत्र, निजाम व हैदरने डोके वर काढले.

समारोप - पानिपतच्या युध्दाने झालेली हानी माधवराव पेशव्याने भरून काढली.

**प्र. २ खालील प्रश्नांची २५ ते ३० वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)**

**१) शायिस्तेखानाची मोहीम व त्याचे शिवाजीमहाराजांनी केलेले पारिपत्य याची माहिती लिहा.**

प्रस्तावना - शायिस्तेखान कोण होता? त्याने मराठ्यांविरुध्द कधी मोहीम काढली?

शायिस्तेखानाची मोहीम - बळ, विध्वंसाचे धोरण, उत्तर कोकण तसेच इंदापूर, सासवड, चाकण येथे आक्रमणे, शेवटी पुण्यास ३ वर्षे मुक्काम

पारिपत्य - रात्रीच्या वेळी छापा, खानावरचे संकट बोटांवर निभावले.

समारोप - शिवाजीराजांचा दरारा वाढला, शायिस्तेखानाचे पलायन, मुघल सत्तेला धक्का

**२) शिवाजीमहाराज कर्नाटक मोहीमेवर का गेले?**

प्रस्तावना -शिवाजीमहाराजांनी कर्नाटक मोहीम कधी काढली?

कर्नाटक मोहीमेची कारणे -

पैसा मिळविणे, जिंजीवरील हक्क बजावणे, कर्नाटकातील अनुकूल राजकीय परिस्थिती, हिंदू सत्ता निर्माण करणे, व्यकोजीला स्वतंत्र राज्याची प्रेरणा देणे, रघुनाथ हणमंतेचा आग्रह व त्याने दिलेली माहिती, बिकट प्रसंगात उपयोगी पडावा असा दूरवरचा प्रदेश मिळविणे.

समारोप - मोहीमेचे परिणाम (दोन ते तीन ओळीत).

**३) मराठेशाहीच्या ऱ्हासाची कोणतीही सहा कारणे लिहा.**

प्रस्तावना - मराठी सत्तेचा अस्त कधी व कसा?

कारणे (खालीलपैकी कोणतीही ६ कारणे)

मध्यवर्ती सत्तेचा अभाव, सततची सत्तांतरे, वतनदारी पध्दतीचे पुनरुजीवन, देशाभिमानाचा अभाव, शिवकाळातील मार्गदर्शक तत्त्वांपासून फारकत, राजकीय धोरणात बदल, लष्करी क्षेत्रातील कमतरता, हेरखात्याकडे दुर्लक्ष, लष्करात शिस्तीचा अभाव, आरमाराकडे दुर्लक्ष, आर्थिक दिवाळखोरी, चौथाई व सरदेशमुखीची वसुली, कर्जबाजारीपणा, व्यापाराची पिछेहाट, खालावलेली प्रतिमा, नैतिकतेचा अभाव, नेतृत्वाचा अभाव, मराठी समाजाचे सांस्कृतिक मागासलेपण.

समारोप - ब्रिटिशांची सत्तास्थापना व आधुनिक इतिहासाची सुरुवात.

**४) मराठेकालीन शिक्षणव्यवस्थेची माहिती लिहा.**

प्रस्तावना - शिक्षण व्यवस्था ही कोणत्याही समाजातील महत्त्वाची पायाभूत संस्था असते. शिक्षणव्यवस्था - शिक्षण ही सरकारची जवाबदारी नव्हती, उतरंडीची रचना नाही, सहज शिक्षण - व्यवसाय व धार्मिक संस्कार औपचारिक शिक्षण - लष्करी, व्यावहारिक व धार्मिक पाठशाळा प्राथमिक शिक्षण - लेखन, वाचन व हिशेब, नंतरचे शिक्षण प्रामुख्याने धार्मिक पुस्तके हस्तलिखितांच्या स्वरुपात. त्यामुळे पाठांतरावर भर शिक्षण प्रामुख्याने ब्राह्मण व पुरुषांपुरते मर्यादित ग्रंथप्रामाण्य व पुढीप्रामाण्य यामुळे शिक्षण स्थितीशील.

समारोप - प्रस्थापित शिक्षण व्यवस्थेचे परिणाम.

**प्र. ३ खालील टिपा २५ ते ३० वाक्यात लिहा. (कोणत्याही दोन)**

**१) मराठ्यांच्या इतिहासाची भौतिक व मौखिक साधने**

प्रस्तावना - इतिहासाची साधने कोणकोणती?

भौतिक साधने - अर्थ व प्रकार - स्थापत्य / इमारती व त्यांचे अवशेष, वस्तू

मौखिक साधने - अर्थ व प्रकार.

समारोप - या साधनांचे महत्त्व.

**२) सुरतेच्या लुटी (इ.स.१६६४ व १६७०)**

प्रस्तावना - सूरतेची अल्प ओळख.

१६६४ची लूट

पार्श्वभूमी - शायिस्तेखानाचा हल्ला

हेतू - अर्थिक नुकसान भरून काढणे

लुटीचा वृत्तांत

परिणाम

१६७०ची लूट

पार्श्वभूमी - आग्र्याहून सुटका

लुटीचा वृत्तांत

परिणाम

समारोप - लुटींचे महत्त्व.

**३) शाहू-ताराबाई संघर्ष**

प्रस्तावना - औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूची मुघलांच्या तावडीतून सुटका. त्यानंतर शाहू व ताराबाई यांच्यात संघर्ष.

संघर्षाची कारणे - शाहू सत्तेचा कायदेशीर वारस, पण मोगलांच्या कैदेत.

ताराबाईचा पक्ष - शिवाजीचे राज्य संभाजीच्या मत्यूबरोबर संपुष्टात, पुढे राजारामाने स्वतंत्र राज्य संपादले, शिवाजीला संभाजी हा वारस म्हणून मान्य नव्हता.

संघर्ष - खेडची लढाई, सातारा - शाहूची राजधानी, कोल्हापूर भागात ताराबाईचे वर्चस्व, मुघल दरबारचा कौल, शाहूचा पक्ष बळकट होतो.

समारोप - कोल्हापूरमध्ये सत्तांतर व संघर्षाचा शेवट.

४) **स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा**

प्रस्तावना - स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी म्हणजे काय?

बाळाजी विश्वनाथाला या सनदा कशा मिळाल्या? दिल्लीतील अंतर्गत कलह, दिल्लीत सत्ताबदल करण्यासाठी सय्यद बंधूंकडून शाहूकडे मदतीची मागणी, तह होऊन या सनदा प्राप्त

सनदाच्या वसुलीची व्यवस्था - मराठामंडळ.

समारोप - सनदांचे मूल्यमापन.

**प्र. ४ अफजलखानाच्या स्वारीची कारणे सांगून स्वारीची माहिती लिहा. अफजलखान वधाचे महत्त्व व परिणाम लिहा.**

प्रस्तावना - अफजलखानाचा अल्प परिचय.

अफजलखानाच्या स्वारीची कारणे -

शिवाजीराजांच्या सामर्थ्यात वाढ व त्यास पायबंद घालण्याची गरज.

स्वारी - अफझलखानाचे सैन्य, मार्ग, योजना, शिवाजीराजांचा विचार, शिवाजी-अफझलखान भेट व खानाचा मृत्यू.

महत्त्व व परिणाम - आदिलशाही प्रदेश, सैन्य व संपत्ती यांचे नुकसान, पराभवाचा अनपेक्षित धक्का, सिद्दी जौहरच्या मोहीमेची आखणी मराठी सत्तेचे वजन वाढले, संपत्ती व प्रदेश यांचा लाभ, सामर्थ्यात वाढ.

समारोप - या पराभवामुळे आदिलशाहीकडून शिवाजीराजांविरुध्द सिद्दी जौहरची नेमणूक.

**प्र.५ पेशवा माधवराव पहिला याच्या काळातील मराठी सत्तेच्या पुनर्स्थापनेसाठी झालेल्या प्रयत्नांचा आढावा घ्या.**

प्रस्तावना - पार्श्वभूमी.

निजामाचा पराभव

हैदरवरील स्वाऱ्या

उत्तरेतील राजकारण व प्रभावाची पुनर्स्थापना, जाटांशी समेट

समारोप - मूल्यमापन.

❁❁❁

# (राज्यशास्त्र)

## भारताचे शासन आणि राजकारण (PS - 1)

**प्रश्न १) पुढील प्रश्नांची ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

१) **भारतीयांना दिलेला प्रौढ मताधिकार –**

**प्रस्तावना –** प्रौढ मताधिकाराचा अर्थ – शिक्षण, जात, धर्म, लिंग इ. भेदाभेद न पाहता ठराविक वयोमर्यादा पूर्ण करणाऱ्या सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार

– राज्यघटनेतील प्रौढ मताधिकार – २१ वर्षे वय पूर्ण झाल्यावर

– घटनादुरूस्तीने सध्याचा प्रौढमताधिकार – १८ वर्षे वय पूर्ण झाल्यावर

–भारतीय नागरिकांनी हा अधिकार योग्यपणे बजावला असे म्हणता येते का– उदाहरणासह स्पष्ट करणे. **समारोप.**

२) **घटकराज्यातील आणीबाणी**

**प्रस्तावना –** घटकराज्यातील आणीबाणी – राज्यपालाच्या अहवालानंतर – राष्ट्रपती लागू करतात – कोणत्या परिस्थितीत – उद्देश कोणता – परिणाम काय होतो यांचे वर्णन करणे. **समारोप.**

३) **संसद सदस्यांचे विशेषाधिकार**

**प्रस्तावना –** संसद सदस्यांना अधिवेशन सुरू असताना व नंतरही काही अधिकार दिलेले असतात – स्पष्ट करणे. हे अधिकार देण्याचा उद्देश. **समारोप.**

४) **भारतातील सनदी सेवांचे प्रकार**

**प्रस्तावना –** सनदी सेवांचे प्रकार – केंद्रसेवा – उदाहरणासहित स्पष्ट करणे.

– राज्यसेवा – उदाहरणासहित स्पष्ट करणे.

– अखिल भारतीय सेवा – उदाहरणासहित स्पष्ट करणे. **समारोप.**

**प्रश्न २) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळींत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) **भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती?**

**प्रस्तावना –** घटनेच्या सरनाम्याची वैशिष्ट्ये – जनतेचे सार्वभौमत्व, सार्वभौम राज्य, प्रजासत्ताक, गणराज्य, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, स्वातंत्र्य, समता, भातृभाव – हे मुद्दे स्पष्ट करणे. **समारोप.**

२) **भारतीय संघराज्य केंद्राकडे झुकलेले आहे असे का म्हटले जाते?**

**प्रस्तावना –** संघराज्य केंद्राकडे झुकण्याची कारणे – अधिकार विभाजन – केंद्रसूची, राज्यसूची, सामायिक सूची
– संघराज्यातील संबंध
– केंद्र व राज्यांतील वैधानिक संबंध
– केंद्र व राज्यांतील आर्थिक संबंध
– आणीबाणीची तरतूद, राष्ट्रपती राजवट. **समारोप.**

३) **१९७७ नंतरचे निवडणुकांनंतरचे चित्र काय दिसते?**

**प्रस्तावना –** काँग्रेसच्या प्रभावात घट
– घटकराज्यात अस्थिरता
– राज्य पातळीवर नव्या राजकीय शक्तींचा (प्रादेशिक पक्ष) उदय
– काँग्रेस विरोधी प्रबळ विरोधी पक्ष उभा करण्यांत अपयश
– आघाड्यांचे राजकारण. **समारोप.**

४) **इंग्रजी आणि हिंदी भाषेच्या समर्थनार्थ व विरोधात कोणते मुद्दे मांडण्यात येतात?**

**प्रस्तावना –** इंग्रजी विरोधी मुद्दे – परकीय भाषा – ब्रिटिश साम्राज्यशाहीचे प्रतीक, इथल्या संस्कृती, लोक यांच्याशी संबंध नाही – इंग्रजीमुळे मानसिक गुलामगिरीची भावना.

इंग्रजी समर्थनार्थ मुद्दे – भाषाशास्त्र, शब्दसंपत्तीने समृद्ध भाषा, आंतरराष्ट्रीय भाषा – या भाषेत वैज्ञानिक, तांत्रिक ज्ञान उपलब्ध.

हिंदी समर्थनार्थ मुद्दे –

बहुसंख्य लोकांनी बोलली जाणारी व समजणारी भाषा – स्वदेशी भाषा – संस्कृतोद्‌भव भाषा – येथील संस्कृतीशी संबंधित – साधी, सोपी व सुंदर

हिंदीविरोधी मुद्दे – तांत्रिक शब्द उपलब्ध नाहीत – दक्षिणेकडील राज्यांचा हिंदीस विरोध. **समारोप.**

**प्रश्न ३) टीपा लिहा. (२५ ते ३० ओळी) (कोणत्याही दोन)**

१) **आणीबाणीविषयक तरतुदी**

**प्रस्तावना –** आणीबाणी हा वादाचा विषय – आणीबाणी केव्हा – १) युद्ध, बाह्य आक्रमण किंवा २) अंतर्गत अशांतता ३) आर्थिक आणीबाणी

आणीबाणीचे परिणाम. **समारोप.**

२) **भारतीय संसदेची रचना, अधिकार व कार्ये –**

**प्रस्तावना –** संसदेची रचना द्विगृही कायदेमंडळ – १) राज्यसभा २) लोकसभा रचना, सदस्य संख्या

संसदेचे अधिकार व कार्य –

१) विधिविषयक अधिकार
अधिकारांवरील मर्यादा

२) आर्थिक अधिकार
अधिकारांवरील मर्यादा

३) प्रशासकीय अधिकार
अधिकारांवरील मर्यादा

४) घटनात्मक अधिकार
अधिकारांवरील मर्यादा

५) इतर अधिकार व कार्ये. **समारोप.**

३) **सर्वोच्च न्यायालयाची रचना, अधिकार व कार्ये**

**प्रस्तावना –** सर्वोच्च न्यायालयाची रचना – प्रमुख न्यायाधीश – पात्रता – नियुक्ती व पदच्युती.
अधिकार व कार्ये
१) मूळचा न्यायाधिकार २) अपीलविषयक अधिकार ३) सल्लाविषयक अधिकार
सर्वोच्च न्यायालयाची कार्ये –
१) घटकराज्य व केंद्रसरकारमधील वाद सोडवणे
२) मूलभूत अधिकारांचे संरक्षण
३) अपीलासाठी विशेष परवानगी देण्याचे अधिकार
४) न्यायाधिकाराच्या कक्षेत नसणाऱ्या प्रकरणाबाबत सल्ला देण्याचा अधिकार
५) अभिलेख न्यायालय
६) स्वतःच्या निर्णयाचे फेरविचार.
७) संसदेने दिलेले अधिकार
८) आज्ञा देण्याचे अधिकार
९) प्रशासकीय
१०) न्यायालयीन पुनर्विलोकनाचे अधिकार. **समारोप.**

४) **महाराष्ट्रातील जात व राजकारण**

**प्रस्तावना –** ब्राह्मण जातीचे राजकारण
– मराठा जातीचे राजकारण
– मुस्लिम जातीचे राजकारण
– इतर मागास जातींचे (OBC) राजकारण. **समारोप.**

**प्रश्न ४) भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांची सविस्तर चर्चा करा.**

**प्रस्तावना –** घटनेने दिलेले मूलभूत अधिकार – समतेचा अधिकार
– स्वातंत्र्याचा अधिकार – सप्त स्वातंत्र्ये
– शोषणाविरुद्धचा अधिकर
– धार्मिक स्वातंत्र्याचे अधिकार
– सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार
– मालमत्ताविषयक अधिकार
– घटनात्मक उपायांबाबतचे अधिकार. **समारोप.**

**प्रश्न ५) राष्ट्रपतींची निवडणूक, मुदत, राजीनामा, याबाबतच्या तरतुदी स्पष्ट करून राष्ट्रपतींचे अधिकार व कामे याबाबत टिपण लिहा.**

**प्रस्तावना –** राष्ट्रपतींची निवडणूक – लोकसभा, राज्यसभेचे सदस्य व राज्यविधिमंडळाचे सदस्य करतात.
प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीने – मुदत, – ५ वर्षे
राजीनामा – उपराष्ट्रपतींकडे – महाभियोगाद्वारे पदच्युत करता येते – पण अवघड पद्धत.
राष्ट्रपतींचे अधिकार व कामे –
१) प्रशासकीय अधिकार
२) विधिविषयक अधिकार
३) न्यायविषयक अधिकार
४) आर्थिक अधिकार
५) आणीबाणीचे अधिकार
अधिकारांचे मूल्यमापन. **समारोप.**

# भारतीय राजकीय विचारवंत (PS - 2)

**प्रश्न १ पुढील चार प्रश्नांची ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

**१) 'राजा राममोहन रॉय - स्त्री मुक्तीचे जनक' स्पष्ट करा.**

उत्तराचे मुख्य मुद्दे - राजा राममोहन रॉय यांच्या काळातील स्त्रियांची अवस्था अतिशय दयनीय होती. म्हणून त्यांनी स्त्रीबंधनाला विरोध करून स्त्री विकासाला प्राधान्य दिले. बालविवाह प्रथेला विरोध केला. सतीची चाल बंद केली. रॉय यांनी अनिष्ट रूढी, परंपरा व प्रथा समूळ नष्ट करून भारतीय समाजाचे कल्याण करण्याचा प्रयत्न केला. म्हणून रॉय यांना 'स्त्री मुक्तीचे जनक' मानले जाते.

**२) न्या. रानडे यांनी भारतीय समाजातील कोणते दोष सांगितले आहेत?**

उत्तराचे मुख्य मुद्दे – अनिष्ट रूढी व परंपरा, धर्माचे जबरदस्त प्राबल्य, बाह्य जगापासून अलिप्त, चौकसबुद्धीचा अभाव, जातिव्यवस्था इत्यादी दोष न्या. रानडे यांनी सांगितले आहेत.

**३) लो. टिळकांना 'भारतीय असंतोषाचे जनक' का म्हटले जाते?**

उत्तराचे मुख्य मुद्दे – सहकाराचे उत्तर सहकाराने देण्यावर भर, तिहेरी स्वरूपाचे कार्य, राष्ट्रीय आंदोलनाला तत्त्वज्ञान आणि निश्चित ध्येयाची बैठक, वस्तुनिष्ठ व्यवहारी भूमिका इत्यादींमुळे लो. टिळकांना भारतीय असंतोषाचे जनक म्हणून ओळखले जाते.

**४) म. गांधींचे शिक्षणविषयक विचार स्पष्ट करा.**

उत्तराचे मुख्य मुद्दे – नवसमाज निर्मितीचे, व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन म्हणजे शिक्षण. शिक्षणातून केवळ बौद्धिक विकासच नव्हे तर नैतिक व आध्यात्मिक विकासही होणे अपेक्षित – चारित्र्य संवर्धन व उद्योग, स्वावलंबन यांचा संबंध शिक्षणाशी जोडला – उद्योगांच्या माध्यमातून शिकवावे. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून – हिंदीलाही स्थान – इतर राष्ट्रांशी व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजीचा समावेश.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**१) राजा राममोहन रॉय यांचे स्वातंत्र्याविषयीचे विचार स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीचा तसेच इंग्लंडमधील उदारमतवादाचा प्रभाव रॉय यांच्यावर पडला. त्यातूनच त्यांच्या स्वातंत्र्याविषयाच्या विचारांना चालना मिळते.

रॉय यांचे स्वातंत्र्याविषयीचे विचार – १) देशाचे स्वातंत्र्य २) व्यक्तीचे स्वातंत्र्य ३) लेखन आणि भाषण स्वातंत्र्य ४) न्यायालयाचे स्वातंत्र्य इ. स्वातंत्र्याचे प्रकार रॉय सांगतात.

**समारोप** – लोकशाहीच्या हिताच्या दृष्टीने रॉय यांचे स्वातंत्र्यविषयीचे विचार पोषक ठरतात.

**२) न्या. रानडे यांच्या राज्यविषयक विचारांची चर्चा करा.**

**प्रस्तावना** – न्या. रानडे यांनी कोणतेही राज्यविषयक तत्त्वज्ञान मांडले नाही. परंतु त्यांनी राज्याला व्यक्ती जीवनात महत्त्वाचे स्थान दिले आहे.

न्या. रानडे यांचे राज्यविषयक विचार –

१) राज्याचे स्वरूप २) राज्याची कार्ये – सामाजिक कार्ये, आर्थिक कार्ये, धार्मिक व सांस्कृतिक कार्ये, राजकीय कार्ये, इतर कार्ये इत्यादी थोडक्यात स्पष्ट करणे.

**समारोप** – न्या. रानडे यांनी आपल्या राज्यविषयक विचारांमध्ये आदर्शवाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद आणि उदारमतवाद यांचा समन्वय साधला आहे.

**३) म. गांधी यांचे स्त्रिया व अस्पृश्यतेबाबत विचार विशद करा.**

**प्रस्तावना** – स्वराज्याबरोबर सुराज्य निर्माण होण्यासाठी म. गांधींनी मानवी स्वभावात सुधारणा घडवून आणण्यावर भर दिला. त्यासाठी त्यांनी उत्तम शिक्षण, स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार व अस्पृश्यतेला विरोध केला आहे. म. गांधींचे सामाजिक विचार –

१) स्त्रिया २) अस्पृश्यता इत्यादी मुद्द्यांच्या आधारे म. गांधींचे सामाजिक विचार स्पष्ट करणे.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे समारोप लिहावा.

४) **डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रवादासंबंधी विचार सांगा.**

**प्रस्तावना** – डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रवादासंबंधी कोणताही सिद्धान्त मांडला नाही. परंतु त्यांनी केलेल्या विविध लिखाणातून डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रवादाविषयीचे विचार स्पष्ट होतात.

डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रवादासंबंधी विचार –

एकतेची भावना, राष्ट्रवाद ही एक नैतिक शक्ती, सामाजिक आशय, एकतेसाठी समान भाषेचा आग्रह, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन, असहिष्णू राष्ट्रवादाचा विरोध.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे समारोप लिहावा.

**प्रश्न ३. टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

१) **लो. टिळकांचा चतुःसूत्री कार्यक्रम**

**प्रस्तावना** – स्वराज्य हे भारतीय जनतेचे ध्येय होते. परंतु हे ध्येय साध्य करण्यासाठी ज्या मार्गांचा अवलंब करावयाचा होता, त्याबाबत काँग्रेसमध्ये तीव्र मतभेद होते. तेव्हा जनतेसमोर लो. टिळकांनी चतुःसूत्री कार्यक्रम ठेवला.

लो. टिळकांचा चतुःसूत्री कार्यक्रम –

१) स्वदेशी २) बहिष्कार ३) राष्ट्रीय शिक्षण ४) स्वराज्य या मुद्यांची थोडक्यात चर्चा करणे.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

२) **म. गांधींचे आर्थिक विचार**

**प्रस्तावना** – म. गांधींचे आर्थिक विचार मानवतावादावर उभारलेले आहे. त्यांनी अर्थविषयक विचारात स्वावलंबनावर भर देऊन खादी ग्रामोद्योगावर आधारित विकेंद्रित अर्थव्यवस्थेवर भर दिला.

म. गांधींचे आर्थिक विचार –

१) औद्योगिकीकरण २) विकेंद्रीकरण ३) सहकारी जीवन ४) विश्वस्तवृत्ती ५) खुशीचे दारिद्र्य इ. मुद्यांच्या आधारे म. गांधींचे आर्थिक विचार लिहिणे.

**समारोप** – म. गांधींनी स्वदेशी, सर्वोदय, विकेंद्रीकरण, विश्वस्तवृत्ती यावर आधारीत आर्थिक विचार सांगितले आहेत.

३) **डॉ. आंबेडकरांचे अस्पृश्यतेसंबंधी विचार**

**प्रस्तावना** – डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. त्यांच्या मते, अस्पृश्यांना मोकळ्या वातावरणात आणले पाहिजे. अस्पृश्यांना समता, बंधुत्व, स्वातंत्र्य, न्याय या तत्त्वांनिशी वागणूक दिली गेली पाहिजे.

डॉ. आंबेडकरांचे अस्पृश्यतेसंबंधी विचार –

१) अस्पृश्यांचे विविध व्यापक प्रश्न सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न (सत्याग्रह)
२) १९३० मधील गोलमेज परिषदेतील मागण्या.
३) पुणे करार
४) मजूर पक्षाची स्थापना
५) शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाची स्थापना
६) धर्मांतर

इत्यादी मुद्यांच्या आधारे डॉ. आंबेडकरांचे अस्पृश्यतेसंबंधीचे विचार व योगदान थोडक्यात स्पष्ट करणे.

**समारोप** – डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी जे योगदान दिले आहे त्यामुळे अस्पृश्य समाजात आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. म्हणूनच त्यांना 'अस्पृश्यांचे कैवारी' म्हटले जाते.

४) **डॉ. लोहिया यांचे समाजवादाविषयी विचार**

**प्रस्तावना** – डॉ. लोहियांनी समाजवादाला भारतीय आशय दिला. त्यांच्या मते, भारताची प्रगती करण्यासाठी समाजवादाशिवाय अन्य मार्ग नाही.

डॉ. लोहिया यांचे समाजवादाविषयी विचार –

१) भांडवलशाहीला विरोध २) साम्यवाद अमान्य ३) ११ सूत्री कार्यक्रम ४) उत्पादन साधनांवर व्यक्तीची व सरकारची मालकी याचा विरोध ५) संपत्तीचे न्याय्य वितरण ६) समाजवाद प्रत्यक्षात आणण्याचे मार्ग ७) अल्पप्रमाण यंत्राचा वापर ८) किंमती ९) शेती १०) चौखांबी राज्य इत्यादी मुद्दे थोडक्यात विशद करणे.

**समारोप** – वरील मुद्द्यांच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**प्रश्न ४. पुढील मुद्द्यांच्या आधारे म. गांधींचे विचार स्पष्ट करा.**

अ) धर्म व राजकारण ब) सत्याग्रह

**प्रस्तावना** – आदर्श मूल्यांचा राजकारणात यशस्वीरित्या उपयोग करणारे म. गांधी हे थोर नेते होते. राजकारणाला त्यांनी नैतिक अधिष्ठान दिले.

अ) धर्म व राजकारण – धर्म व राजकारण यांची म. गांधींनी सांगड घातली. मानवता धर्माचा पुरस्कार केला. सर्वधर्मसमभावावर त्यांनी भर दिला. मानवता धर्म, ईश्वरावर श्रद्धा, सर्वधर्मसमानता इ. मुद्दे लिहिणे अपेक्षित आहे.

ब) सत्याग्रह – असहकार, हरताळ, सामाजिक बहिष्कार, धरणे, सविनय कायदेभंग, हिजरत, उपोषण, संप इत्यादी सत्याग्रहाची साधने/मार्ग थोडक्यात विशद करणे.

**समारोप** – वरील मुद्द्यांच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**प्रश्न ५. डॉ. लोहिया यांचे 'समता' विषयक विचारांची चर्चा करा.**

**प्रस्तावना** – डॉ. लोहिया यांची समतेविषयीची कल्पना सुखावणारी आहे. त्यांनी सर्वांगीण क्षेत्रातील समतेचा पुरस्कार केला आहे.

डॉ. लोहिया यांचे 'समता' विषयक विचार –

१) समतेखेरीज स्वातंत्र्य संभवत नाही. २) समतेद्वारे स्वातंत्र्याचा पाया पक्का केला जाऊ शकतो. ३) मोक्षाला महत्त्व ४) समता व समृद्धी या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. ५) सात प्रकारच्या विषमता व त्यांच्यासाठी सात प्रकारच्या क्रांती डॉ. लोहिया सांगतात. ६) समता प्रस्थापित करण्यासाठी ११ कलमी योजना.

**समारोप** – डॉ. लोहियांनी आपला समतेविषयीचा दृष्टिकोन सर्वांगांनी स्पष्ट केला आहे.

❆❆❆

# (भूगोल)

## <u>वस्ती भूगोल (GS – 1)</u>

**प्रश्न १ पुढील प्रश्नांची उत्तरे ८ ते १० ओळीत लिहा.**

**१) वस्ती भूगोलाच्या अभ्यासाचे उद्देश लिहा.**

मुद्दे – नैसर्गिक पर्यावरणाशी जवळचा संबंध, वस्त्यांच्या स्थानांवर विकास व कार्ये अवलंबून, वस्तीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, वस्ती व पर्यावरणाचे संबंध कालसापेक्ष, वस्त्यांचा विकास व ऱ्हास, ग्रामीण व नागरी वस्तीचा अभ्यास इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**२) नागरी वस्तीची प्रमुख वैशिष्ट्ये लिहा.**

मुद्दे – कार्याचे स्वरूप, व्यक्तिमत्त्वात बदल, शैक्षणिक सुविधा, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रभाव क्षेत्र, सेवा सुविधा, वाहतूक क्षेत्र, वितरण इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक.

**३) भारतातील नगरांची वैशिष्ट्ये लिहा.**

मुद्दे – भारतातील नगरांना प्रदीर्घ इतिहास, संस्कृती, संरक्षण, ऐतिहासिक वास्तू, नगराची अंतररचना, इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

४) **आयताकृती ग्रामीण वस्त्यांची माहिती लिहा.**

मुद्दे – शेतीच्या क्षेत्रात, घरांची रचना, रस्ते, मैदाने, ऐतिहासिक ठिकाणे, इत्यादी मुद्द्यांचे उदाहरणासह स्पष्टीकरण.

**प्रश्न २ पुढील उत्तरे २५ ते ३० ओळीत लिहा. (कोणतेही दोन)**

१) **वस्ती भूगोलाची व्याप्ती स्पष्ट करा.**

प्रस्तावना – वस्ती भूगोलाची व्याख्या.

मुद्दे – काळानुसार मानवाचा विकास, गरजाच्या पूर्तीची कालसापेक्षा, क्षेत्रीय व्यवस्था, वस्तीची निर्मिती, विस्तार विकास, क्रियापद्धतीत बदल, संस्कृतीची विविध अंगे, वस्तीची आंतररचना, कार्ये, पर्यावरणाशी निगडीत, स्थलीय पार्श्वभूमी या सर्व मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

२) **ग्रामीण व नागरी वस्त्यामधील फरक स्पष्ट करा.**

प्रस्तावना – जगाच्या विविध भागात ग्रामीण व नागरी वस्त्या विखुरलेल्या आहेत.

मुद्दे – लोकसंख्या, प्रशासकीय व्यवस्था, आर्थिक व्यवसाय, वस्तीतील सुविधा, वस्त्यांची कार्ये, प्रभावी घटक या मुद्द्यांचे उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक.

३) **वस्त्यांच्या केंद्रीकरणावर परिणाम करणाऱ्या प्राकृतिक घटकांची माहिती लिहा.**

प्रस्तावना – केंद्रीकरणाची व्याख्या.

मुद्दे – मूलभूत गरजा, प्रतिकूल परिस्थिती, भौगोलिक घटक, नैसर्गिक आपत्ती, वस्त्यांचे पुनर्वसन, शेतीसाठी, हवामान, प्राथमिक व द्वितीय व्यवसाय या सर्व मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

४) **पुणे शहराचे महत्त्व स्पष्ट करा.**

प्रस्तावना – पुणे शहराला जुना इतिहास त्याचे वर्णन.

मुद्दे – अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, दशलक्षी शहर, कॉलेजेस, कारखानदारी, रसायन, औषधांचे कारखाने, पर्यटन केंद्र, एकता, बंधुता, सोयी सुविधा, संस्कृती. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**प्रश्न ३ टीपा लिहा. (कोणतेही दोन)**

१) **ग्रामीण वस्त्यांची कार्ये.**

प्रस्तावना – मानव आणि वस्ती यामधील अनुबंध हे कार्यान्वित असतात, या कार्यान्वितपणामुळे कोणत्याही वस्तीत चालणारी विविध कार्ये अभ्यासणे महत्त्वाचे असते.

मुद्दे – प्राथमिक व्यवसायाचे स्वामित्व, सामाजिक श्रेणीचे प्रमुख, उदरनिर्वाहक व्यवसायाची स्थिती, सामाजिक संस्थावर अधिष्ठान इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.

२) **ग्रामीण वस्त्यांचे आकार**

प्रस्तावना – सर्व ग्रामीण वस्त्या केंद्रीय स्वरूपाच्या असतात, यामुळे केंद्रीकरण जास्त होते.

मुद्दे – रेषीय, आयताकृती, चौरसाकृती, अरिय वस्त्या, द्विकेंद्रित वस्त्या या सर्व आकाराच्या वस्त्यांचे आकृतीसह स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

३) **महाराष्ट्रातील घरांचे प्रकार**

प्रस्तावना – महाराष्ट्रात सांस्कृतिक विभिन्नता मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे घरांच्या प्रकारातही विभिन्नता आढळते.

मुद्दे – घरांचे स्वरूप, घरांचा आकार, रंग, घरबांधणी साहित्य, घरांचे स्थान, घरांची सर्वसामान्य वैशिष्ट्ये, घराचे नियोजन इत्यादी मुद्द्यांचे आकृतीसह वर्णन करा. समारोप.

४) **भारतातील प्रमुख शहर मुंबई**

प्रस्तावना – मुंबई हे शहर भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेले आहे. हे जगातले एक अग्रणी महानगर म्हणून ओळखले जाते.

मुद्दे – प्राकृतिक रचना, स्थान, विकास, मोठमोठ्या संस्था, केंद्रीय व्यवहार, कार्ये – कारखानदारी, व्यापार, व्यवसाय, विद्यापीठ, शिक्षण संस्था, उच्च न्यायालय इत्यादी मुद्द्यांची सविस्तर माहिती लिहिणे आवश्यक.

**प्रश्न ४ ग्रामीण वस्त्यांमधील घरबांधणी साहित्याविषयी सविस्तर माहिती लिहा.**

प्रस्तावना – पर्यावरणातील घटकांपासून मानवी समूहाचे रक्षण व्हावे म्हणून घरांचे कार्य महत्त्वपुर्ण ठरते.

मुद्दे – बांधकाम साहित्य – माती, दगड, लाकूड, गवत कृषि उत्पादनातील साहित्य, सिमेंट व जिप्सम, लोहपोलाद या साहित्याचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप – कोणत्याही क्षेत्रात घरबांधणीसाठी एखादाच साहित्यप्रकार न वापरता विविध साहित्यप्रकारची बांधणी करून आवश्यकतेनुसार साकार केली जातात.

**प्रश्न ५ वस्त्यांच्या विकेंद्रीकरणावर परिणाम करणारे घटक उदाहरणासह स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – विकेंद्रीत वस्त्यांची निर्मिती औद्योगिक क्रांतीच्या पर्वापासून आजतागायत पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात झाल्याचे दिसून येते. विकेंद्रीकरणाची व्याख्या.

**मुद्दे** – १) प्राकृतिक घटक, २) आर्थिक घटक, ३) सामाजिक घटक, ४) राजकीय घटक, ५) लोकसंख्या, ६) सांस्कृतिक घटक इत्यादी घटकांचे उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**समारोप** – भारतामध्ये जगातल्या कोणत्याही देशापेक्षा जाती, धर्म, पंथ व विचारप्रणाली यांच्यात फार मोठी विविधता असल्याने इतिहासकाळापासून आजतागायत वस्त्यांचे विकेंद्रीकरण झाल्याची उदाहरणे आहेत.

## साधनसंपत्ती आणि पर्यावरण (GS – 2)

**प्रश्न १ पुढील प्रश्नांची उत्तरे ८ ते १० ओळीत लिहा.**

१) **साधनसंपत्तीची व्याख्या लिहा.**

मानवी जीवनाला व त्याच्या अस्तित्वाला उपयुक्त असणाऱ्या वस्तूंना साधनसंपदा म्हणतात. तसेच जॅकी स्मिथ, पी. ई. मॅकनल, रास. ए. मालक या शास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या लिहिणे अपेक्षित.

२) **जंगलाचे प्रत्यक्ष उपयोग लिहा.**

लाकूड, कोळसा, फर्निचर, कच्चा माल, औषधे, पशुपालन, पर्यावरण संकलन, जंगलातील विविध पदार्थ इ.

३) **दगडी कोळशाचे उपयोग लिहा.**

औष्णिक उर्जा, घरात इंधन म्हणून, डांबर, रसायने, रंग, बेन्झाक निर्मितीसाठी तेल, गंधक, कोक इ.

४) **जलप्रदूषणाच्या व्याख्या लिहा.**

जे काही पदार्थ पाण्याचा दर्जा कमी करण्यास कारणीभूत होतात त्यांना जलप्रदूषणे असे म्हणतात. तसेच पी. व्ही. विव्हीयर, सी. एम. साऊथव्हिक याही शास्त्रज्ञांनी लिहिलेल्या व्याख्या लिहणे अपेक्षित.

**प्रश्न २ रा. पुढील प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० ओळीत लिहा. (कोणतेही दोन)**

१) **निर्वणीकरणाची कारणे स्पष्ट करा.**

प्रस्तावना – निर्वणीकरणाची व्याख्या.

मुद्दे – लोकसंख्या वाढ, शेतीचा विस्तार, स्थलांतरित शेती, मूलभूत सुविधांचा विकास, वणवे, उद्योगधंद्यात वाढ, नैसर्गिक प्रकोप, इंधनासाठी उपयोग इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक, इ. समारोप.

२) **विनाशी उर्जा साधनाविषयी थोडक्यात माहिती लिहा.**

प्रस्तावना – विनाशी उर्जा साधनाची व्याख्या.

मुद्दे – दगडी कोळसा, खनिज तेल, नैसर्गिक वायू, अणूउर्जा इत्यादी साधनाची माहिती लिहिणे अपेक्षित.

समारोप – विनाशी उर्जा साधने पुनिर्निर्मिती करणे मानवाला शक्य नाही, त्यामुळे या उर्जा साधनाचे काळजीपुर्वक नियोजन करणे आवश्यक आहे.

३) **आम्ल पर्जन्याचे परिणाम स्पष्ट करा.**

प्रस्तावना – आम्ल पर्जन्याची व्याख्या.

मुद्दे – जमिनीतील पोषक द्रव्य नष्ट, सूक्ष्मजीवांचा नाश, वनस्पतींची प्रतिकार शक्ती कमी, जलचर प्राण्यांना हानीकारक, मानवाला शारीरिक आजार, ऐतिहासिक वास्तुवर परिणाम इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

४) **जलप्रदूषणाचे परिणाम स्पष्ट करा.**

प्रस्तावना – जलप्रदूषणामुळे विविध स्वरूपाचे गंभीर परिणाम मानवी आरोग्यावर तसेच पर्यावरण व पशुपक्षी जीवन यावर होत असतो. जलप्रदूषणाची व्याख्या.

मुद्दे – विविध रोगांचा प्रसार, पारा, तांबे, किटकनाशके, शिसे, फ्लुराइडचा दुष्परिणाम, कोबाल्ट, क्रोमियम, जस्त, रासायनिक खते, किरणोत्सर्गी पदार्थ या सर्व मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप – जलप्रदूषण रोखण्यासाठी कडक कायदेशीर कार्यवाही केली पाहिजे.

**प्रश्न ३ रा. टीपा लिहा (कोणतेही दोन)**

१) **वनसंवर्धनासाठी उपाय**

प्रस्तावना – मानव व सजीव यांच्या जीवनक्रमात वनस्पतीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

मुद्दे – उपाय – वनसंवर्धनासाठी संशोधन, चर्चासत्रे, कृतीसत्रे, शास्त्रशुद्ध पद्धतीने वन लागवड, जंगलतोडीस बंदी, झाडांचे संरक्षण पट्टे वाढविणे, वाळू – रेतीचे आक्रमण थांबविणे, पाणलोट क्षेत्राचा विकास, लोकांना पर्यावरणाचे महत्त्व समजावणे, अभ्यासक्रमात पर्यावरणाचा समावेश इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप – यासाठी सरकारने कडक व खंबीर भूमिका घेणे आवश्यक आहे.

२) **पवन उर्जेचे महत्त्व**

प्रस्तावना – वाऱ्यापासून जी उर्जा प्राप्त होते अशा उर्जेला पवन उर्जा असे म्हणतात.

मुद्दे – एक स्वच्छ उर्जा प्रकार, निसर्गात सर्वत्र उपलब्ध एक अक्षय प्रकार, पवन उर्जा निर्मिती करणारी यंत्रे आधुनिक व कार्यक्षम, मोठ्या जागेची आवश्यकता नसते, खर्च कमी, इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

३) **हवा प्रदूषणाचे परिणाम –**

प्रस्तावना – हवा प्रदूणाची व्याख्या, थोडक्यात स्पष्टीकरण.

मुद्दे – दृष्टीदोष, शेती आणि वनस्पतीचे नुकसान, अजैविक पदार्थावरील परिणाम, मानवावरील परिणाम, इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

४) **लोकसंख्या वाढीचे परिणाम.**

प्रस्तावना – लोकसंख्येची व्याख्या.

मुद्दे – जमीन उत्पादन, साधन संपत्ती, मूलभूत गरजा, प्रदूषण, प्रादेशिक, स्थलांतर तसेच आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घटक या मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**प्रश्न ४ था जंगलाचे अप्रत्यक्ष फायदे लिहा.**

प्रस्तावना – मानवाला जंगलापासून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात फायदे मिळतात.

मुद्दे – अप्रत्यक्ष फायदे – पर्यावरण समतोल, जलसंवर्धन पर्जन्यात वाढ होण्यास मदत, हवामान, आद्रतेत वाढ, धूपनियंत्रण, मृदा संपदेत वाढ, वादळी वाऱ्यापासून संरक्षण, वाळवंटीकरणाची प्रक्रिया नियंत्रित, पशुपक्षी संरक्षण, निसर्ग सहवास व करमणूक, प्रदूषण नियंत्रण इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक, समारोप.

**प्रश्न ५ वा पर्यावरणशास्त्राच्या व्याख्या लिहा व व्याप्ती व स्वरूप स्पष्ट करा.**

प्रस्तावना – मानवाने स्वतःच्या स्वार्थाकरीता निसर्गामधील असलेल्या अनेक साधनांचा प्रचंड वापर केला त्यामुळे पर्यावरणामध्ये अनेक स्वरूपाच्या समस्या निर्माण झाल्या यामुळे पर्यावरणशास्त्राचा अभ्यास करणे आवश्यक झाले आहे. पर्यावरण शास्त्राची व्याख्या.

मुद्दे – व्याप्ती - पर्यावरण संकल्पना, परिसंस्थाचा अभ्यास, परिस्थितीकी संकल्पना, पर्यावरण आपत्ती, साधनसंपत्तीचा अभ्यास, पर्यावरणीय प्रभाव परीक्षण, पर्यावरण नियोजन, पर्यावरण व्यवस्थापन.

स्वरूप – मानव पर्यावरण यांच्या आंतरसंबंधाचा अभ्यास करणे, गतिमान शास्त्र, आंतरविद्याशास्त्रीय स्वरूप, गुंतागुंतीचे शास्त्र, अनुभवाधिष्ठित शास्त्र, समन्वयक शास्त्र इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.